general one, but an universal trait of their (natives,
character, their temperance is demonstrated in th
simplicity of their food, and their total substinenc
from spirituous liquors and other substances *of* intoxi
cation.

*E. I. C. Affairs.*



आला आहे, आम्ही तुमचीं पत्रें मानीत नाहीं, इंग्रजां सारखें सु-
ख, शांतिकर राज्य आम्हास फार आवडतें असें ह्मणण्याचा पत-
कर तत्प्रांतीय लोकांनीं घेतला आहे, त्या प्रांताची १८४६ साल-
ची हवालच ऐकिली असतां आमच्या वाचकांस आश्चर्य समुद्रांत
गटकळ्या खाव्या लागतील ! यांच्याच राज्यव्यवस्थेच्या अखेर-
च्या तहा नंतर जो जाहिरनामा तिकडे प्रसिद्ध केला होता त्यांत
"महाराजा विषयीं आपणास फार काळजी वाटते; व त्यांचें लालन
पालन आणि शिक्षण इत्यादिकां विषयीं आपण त्यांच्या पित्याप्रमाणें
खबरदारी घेऊं" हें वाक्य आणि धुलीपसिंगाची प्रस्तुतची स्थिति यांत
किती तरी अंतर! त्यावेळच्या रीजन्सीचा थाट आणि देखावा हल्लींच्या
शिंदेशाई तोऱ्याप्रमाणेंच होता पण तो सर्व फडशा ! ! मार्शमन सा-
हेबांनीं केलेल्या संक्षिप्त इतिहासांत "ब्रिटिश फौजेस माघारी बो-
लावून नेलें तर खालशाचा बंडावा पुनः माजेल अशी १८४६ च्या
अखेरीस लाहोरच्या प्रधान मंडळीनें आणि दरबारांतील अति वज-
नदार सरदारांनीं लार्ड हार्डिंज साहेबांची फार विनंति केल्यावरून
त्यांनीं त्यांच्या आग्रहास मोठ्या नाखुषीनें रुकार दिला. त्यावेळीं
नवीन तह ठरला. त्याजवर बावन सरदारांनीं आपल्या सह्या घातल्या.
आठ सरदारांची एक मंडळी नेमून तिनकडे राज्याचा सर्व कारभार
सोंपवावा, ह्या मंडळीनें रेसिडेंटाचे तंत्रानें वागावें व तिजवर अधि-
कार चालवावा, राज्यांतील किल्ल्यांतून व छावण्यांतून ब्रिटिश फौज
ठेवावी, ह्या फौजेच्या खर्चासाठीं २२ लक्ष रुपये देत जावे, व
महाराज धुलिपसिंग वयांत येईपर्यंत "आठ वर्षे मात्र ही व्यवस्था
चालावी" अशी ह्या तहांत कलमें होतीं, असें आहे. हीं आठ
वर्षे ब्रह्मदेवाच्या युगाचीं आहेत कीं कसें हें कोण्या फ्रेंच जोतिषाशि-
वाय सांगतां येणें कठीण आहे ! ! असो,

बंगाल प्रांतींच हा प्रकार घडला आणि दक्षिण व कर्नाटक प्रां-
तांत तरवार गाजविली आणि तीहीपण परोपकार बुद्धीनें व धर्म-

युद्ध करून गाजविली असें सांगण्यास इतिहासांत स्थल नाहीं ! शिंदे, होळकर, गायकवाड इत्यादिकांशीं केलेले तह, राघोबा भरारी यास दिलेलीं वचनें आणि त्यांची अम्मल बजावणीचे वेळीं केलेली दैना, ज्या राज्यास वास्तविक धर्म ह्मणून कांहीं आहे त्यांत आढळणार नाहीं ! इतकेंच नाहीं पण प्रत्येक गोष्टींत अनृत, साहस, आणि जुलूम आढळेल! फारतर काय पण आमचे सातारच्या श्रीमंत प्रतापसिंव्ह महाराजावरील बंडाचा आरोप, त्यांत घेतलेल्या जबान्या, साक्षीदारांस उत्तम साक्षी बद्दल दिलेलीं बक्षिसें, रेसिडेंट साहेबांनीं मारलेला ताव, भल्या पहाटेस राजवाड्यास घातलेला गराडा आणि तोफांचा ऐरभाव, महाराजांचे काशीस उच्चाटन, काशीस पोंचल्या नंतर आपली खानगी १५ लक्षांची जिनगी देण्याचें वचन आणि पुढें दाखविला अंगठा! किती जोरकस, न्यायाचा आणि सद्धर्म प्रकाशक होता हें पहाणारे लोक अद्याप हयात आहेत ! ! ज्या राजमंदिरांत मराठी राष्ट्राधिपाचें सिंव्हासन होतें, पेशवे, प्रतिनिधी, शिंदे, होळकर, इत्यादि शूर सरदारादिकांच्या बैठका असत, त्या राजवाड्यांत विद्यादेवीच्या उपासक मंडळींचीं लांकडी चौखुरी आसनें मांडलीं आहेत आणि त्यांजवर परदास्यभक्त कायावाच्या मनें करून उपासना करीत आहेत ! ! अहीमहीनें देवीस बळी देण्याकरतां रामलक्ष्मणास आणलें असतां हनुमंतानें देवीस मोरींत बसवून आपण त्या जागीं बसला आणि अहीमहीची चांदी आटवून आपल्या यजमानास सुखी केलें. तद्वत आमच्या नव्या राजमंदिरांतील देवी नाहींशी करून हनुमंत मात्र कायम झाले ! ! हा राजकीय इतिहास किती चमत्कारिक आहे हें आमच्या नूतन वाचकांस कळण्यास इंग्रजी इतिहासांत साधन मिळणार नाहीं. सबब त्यांनीं रंगो बापूजीनीं विलायतेस केलेली खटपट पहावी, आणि आमच्या दयाशील राज्ययंत्रांतून कसकशीं राज्यचिन्हें बाहेर निघतात,



विलायती सिंह्यांचे अचाट वक्तृत्वओघांत वाहून गेलेल्या राष्ट्राचे कसे वसले पडतात, आणि अन्यायाचे तरंग.नें सर्व वक्तृत्वोत्र कसा भरून जातो हें पहाण्या करतां आमच्या श्रीमंत सगुणा बाईनीं केलेलें अपील,—साधकानीं साधलेलें न हलूं देण्याची युक्ती आणि त्यावरून शिवाजी राजाचे वंशजांचें राज्यत्व काढून सरदारत्व देण्यांत अर्थ काय—हीं चांगलीं साधनें आहेत. हें सांगण्याचें तात्पर्य हेंचकीं आमचे राज्यकर्ते हिंदुस्थानाचें राज्य चालविण्यांत जी परोपकार बुद्धि व्यक्त करीत आहेत तिची मिमांसा " मतलब सिधूंतच " कायती सांपडणार आहे ! ! तरवारीचा जोर, हेंच आमच्या राज्यकारभारीचें मुख्य साधन आहे असें जे कित्येक शहाणे इंग्रज ह्मणतात ते हिंदुस्थानांतील इंग्रजांचा इतिहास वांचून ह्मणत असतील तर, तो मारेस साहेबांचा निर्मळ इतिहासच असेल ! ! मुसलमान आणि मराठ्यांचे इतिहासांतील तत्व जाणून ह्मणत असतील तर तें मारेस साहेबां शिवाय इतर इतिहासज्ञ गुरूपासूनच शिकून ह्मणत असतील तर असतील ! किंवा शाळेंत असतां ग्रीक, रोमन, फ्रान्स, जर्मन इत्यादि राष्ट्रांच्या लढायांचीं वर्तमानें कानावरून गेलीं असतील, नेपोलियन बोनापार्टाची कहाणी कोणी शाहीर गातांना ऐकिली असेल, ड्यूकआफ वेलिंगटनचें चरित्र वाचलें असोन त्यांत त्यानें या महाशूर पराक्रमी योध्यांचें कांडांत काढल्याचें वाचलें असेल आणि तो हिंदुस्थानांत होता, एवढें कानावरून गेले असेल. तसेंच लार्ड मेकाले साहेबांचे परम दोस्त जे क्लाईव्ह साहेब, त्यांचीं दोस्तीखातर चटकदार भाषेनें केलेलीं वर्णनें वाचलीं असतील तर वरील प्रकारचें मत होण्याचा संभव आहे ! ! या शिवाय आमच्या दक्षिणी धोंडीबा वाघानें किंवा बापू गोखल्यानें अथवा परशुरामभाऊ पटवर्धनांनीं नुसत्या तरवारीचे धारेवर आणि मनगटाचे जोरावर मर्दुमकीची जितकीं कामें केलीं त्याच्या एक दशांस काम एखाद्या इंग्रजानें स्वतंत्रपणें केल्याचें दिसत

नाहीं ! ! तेव्हां शूरपणा वगैरेच्या ज्या गोष्टी आपण त्यांच्या ऐकतों त्या केवळ विलायती गप्पा होत.

असें असतां व पोर्तुगीज, दच, फ्रेंच, इत्यादिकां सारखे त्यांचे खंड बांधव त्यांस वैरी असतां तेच आमचे राजे आणि आह्मी त्यांची प्रजा कसे बनलों ? हा प्रश्न पुढें येतो. या प्रश्नाचें एक उत्तर असें आहे कीं, त्यांच्या सद्दीचा जोर ! हिंदुस्थानच्या व्यापाराचें तर असोच पण जगांतील सर्व देशाशीं व्यापार करण्याचें तारू हकारतांना काय घबाड मुहूर्त सांपडला हरीजाणें, भांत बल्याची पाळी ह्मणून नाहींच आली ! ! इतकेंच नाहीं पण व्यापार करतां करतां कित्येक देशांतील प्रांत काबीज केले, कित्येक देश तोंडांत टाकले आणि कित्येकांच्या हद्दींतील समुद्राचे आगस्ती ऋषीप्रमाणें आचमन केलें ! ! तरी व्यापार कायमच ! तेव्हां हा सद्दीचा जोर सामान्य ह्मणावा काय ? हा इतका प्रकार चालला असतां घरांत शांती होती असेंही दिसत नाहीं. आज एकाचा उदय तर दुसऱ्याचा अस्त, राजकीय पक्षास उताणें पाडून त्याच्या छातीवर बसण्यास प्रजापक्ष टपलेलाच आहे, दोन्ही पक्षास ढकलून देऊन भटजीबोवा आपलें तट्टू पुढें ढकलण्यास तयार असतातच ! राजाप्रजेचें लाथाळें तर चालू आहेच पण प्रधानाप्रधानांत तंटे, राजाराणींत तंटे, गादीबद्दल वाद कांहीं कमी झाले असें नाहीं तथापि व्यापारांत आणि राज्यवृद्धींत क्षय आला असें घडलें नाहीं ! ! तिसरे, जार्ज राजाचे कारकीर्दीत यांच्या राजकीय, धर्म आणि व्यापार यास काय धक्का बसला तेवढाच. तो धक्का असा बसला कीं, त्यांत इंग्लंड देशाचें राजकीय संबंधानें जें नुकसान झालें तें मात्र न भरून येण्या जोगें झालें. पण त्यांचे देशबांधवांतून आणि खंडबांधवांतून लक्षावधी लोकांचें कोटकल्याण झालें! स्वातंत्र्य, कीर्ति, सुख आणि वैभव जें आज जगांत गाजत आहे, ज्याकडे पाहून आपणही तसेंच व्हावें असें परवशतेची तिखट सुरी ज्यांचे उरीं बसली आहे त्यांस



तर वाटतेंच पण जे स्वतंत्र आणि सधन देश आहेत ते देखील ज्या देशाचें वैभव पाहून मत्सर आणि हेवा करण्यास तयार आहेत त्या अमेरिकेचें स्वातंत्र्य हेंच या वेळचे इंग्रजी राज्यास अपायकारक कृत्य काय तें घडलें !

राष्ट्रीय सभेची उत्पत्ति आणि तिची खरी किंमत उदयास आली ती या प्रसंगास, आणि यांच लोकांकडून. अमेरिकेचे स्वातंत्र्याचा पाया राष्ट्रीय सभाच होय असें अनेकांचें ह्मणणें आहे तें कितपत खरें आहे हें आमच्यानें सांगवत नाहीं. तथापि राष्ट्रीय सभेनें वेळोवेळीं जी प्रशंसनीय कामें केलीं आणि संकटें भोगलीं त्यांवरून तिचें खरें स्वरूप सर्व लोकांस चांगलें कळलें होतें असें मानण्यास जागा आहे. या राजाचे कारकीर्दींत इंग्रजांचे सद्दीच्या जोरास कमकुवतपणा येण्यास जीं कारणें झालीं त्यांत हें एकच कारण जरी प्रमुख होतें तरी फ्रान्स व स्पेन, या दोन राष्ट्रांशीं लढाई; हिंदुस्थानांतील इंग्रजांची दांडगाई, ती मोडण्याकरितां सुप्रीम कोर्टाची स्थापना, रोमन क्याथोलिक आणि प्रोटेस्टंट यांच्यांत कलह, मारामाऱ्या, रक्तपात आणि जाळापोळीचा रामरगाडा, इत्यादि अनेक संकटें आलीं तथापि सद्दीचा जोर चढावर असल्यामुळें त्या सर्वांची व्यवस्था लागून अबादी झाली आणि तो खर्चही पण परस्पर भागला ! !

दुसरें उत्तर, इंग्रज लोकांचे आंगचे स्वाभाविक गुण आणि त्यांची राज्यपद्धत हें होय. स्वराजनिष्ठेनें वागण्याचा इंग्रज लोकांमध्यें जसा गुण आहे तसा इतर राष्ट्रीयांत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लक्षांत ठेवण्यासारखें आहे इतकेंच नाहीं पण आश्चर्य मानण्यासारखें आहे ! तेथील केवढा आणि कोणीही पराक्रमी पुरुष निपजो, राज्यकारस्थानी निपजो अथवा स्वबुद्धीबलावर प्रजेचा सरनाईक बनतो तो धनीचाकराचें नातें विसरत नाहीं ! कोणी प्रजेचा चाकर ह्मणून उदयास येतो, कोणी राजाचा पूर्ण प्रीतिपात्र

नाहीं ! ! तेव्हां शूरपणा वगैरेच्या ज्या गोष्टी आपण त्यांच्या ऐकतों त्या केवळ विलायती गप्पा होत.

असें असतां व पोर्तुगीज, दच, फ्रेंच, इत्यादिकां सारखे त्यांचे खंड बांधव त्यांस वैरी असतां तेच आमचे राजे आणि आह्मी त्यांची प्रजा कसे बनलों ? हा प्रश्न पुढें येतो. या प्रश्नाचें एक उत्तर असें आहे कीं, त्यांच्या सद्दीचा जोर ! हिंदुस्थानच्या व्यापाराचें तर असोच पण जगांतील सर्व देशाशीं व्यापार करण्याचें तारू हकारतांना काय घबाड मुहूर्त सांपडला हरिजाणें, आंत बल्याची पाळी ह्मणून नाहींच आली ! ! इतकेंच नाहीं पण व्यापार करतां करतां कित्येक देशांतील प्रांत काबीज केले, कित्येक देश तोंडांत टाकले आणि कित्येकांच्या हद्दींतील समुद्राचें आगस्ती ऋषीप्रमाणें आचमन केलें ! ! तरी व्यापार कायमच ! तेव्हां हा सद्दीचा जोर सामान्य ह्मणावा काय ? हा इतका प्रकार चालला असतां घरांत शांती होती असेंही दिसत नाहीं. आज एकाचा उदय तर दुसऱ्याचा अस्त, राजकीय पक्षास उताणें पाडून त्याच्या छातीवर बसण्यास प्रजापक्ष टपलेलाच आहे, दोन्ही पक्षास ढकलून देऊन भटजीबोवा आपलें तट्टू पुढें ढकलण्यास तयार असतातच ! राजाप्रजेचें लाथाळें तर चालू आहेच पण प्रधानाप्रधानांत तंटे, राजाराणींत तंटे, गादीबद्दल वाद कांहीं कमी झाले असें नाहीं तथापि व्यापारांत आणि राज्यवृद्धींत क्षय आला असें घडलें नाहीं ! ! तिसरे, जार्ज राजाचे कारकीर्दींत यांच्या राजकीय, धर्म आणि व्यापार यास काय धक्का बसला तेवढाच. तो धक्का असा बसला कीं, त्यांत इंग्लंड देशाचें राजकीय संबंधानें जें नुकसान झालें तें मात्र न भरून येण्या जोगें झालें. पण त्यांचे देशबांधवांतून आणि खंडबांधवांतून लक्षावधी लोकांचें कोटकल्याण झालें! स्वातंत्र्य, कीर्ति, सुख आणि वैभव जें आज जगांत गाजत आहे, ज्याकडे पाहून आपणही तसेंच व्हावें असें परवशतेची तिखट सुरी ज्यांचे उरीं बसली आहे त्यांस



तर वाटतेंच पण जे स्वतंत्र आणि सधन देश आहेत ते देखील ज्या देशाचें वैभव पाहून मत्सर आणि हेवा करण्यास तयार आहेत त्या अमेरिकेचें स्वातंत्र्य हेंच या वेळचे इंग्रजी राज्यास अपायकारक कृत्य काय तें घडलें !

राष्ट्रीय सभेची उत्पत्ति आणि तिची खरी किंमत उदयास आली ती या प्रसंगास, आणि यांचे लोकांकडून. अमेरिकेचे स्वातंत्र्याचा पाया राष्ट्रीय सभाच होय असें अनेकांचें ह्मणणें आहे तें कितपत खरें आहे हें आमच्यानें सांगवत नाहीं. तथापि राष्ट्रीय सभेनें वेळोवेळीं जी प्रशंसनीय कामें केलीं आणि संकटें भोगलीं त्यांवरून तिचें खरें स्वरूप सर्व लोकांस चांगलें कळलें होतें असें मानण्यास जागा आहे. या राजाचे कारकीर्दींत इंग्रजांचे सद्दीच्या जोरास कमकुवतपणा येण्यास जीं कारणें झालीं त्यांत हें एकच कारण जरी प्रमुख होतें तरी फ्रान्स व स्पेन, या दोन राष्ट्रांशीं लढाई; हिंदुस्थानांतील इंग्रजांची दांडगाई, ती मोडण्याकरितां सुप्रीम कोर्टाची स्थापना, रोमन क्याथोलिक आणि प्रोटेस्टंट यांच्यांत कलह, मारामाऱ्या, रक्तपात आणि जाळापोळीचा रामरगाडा, इत्यादि अनेक संकटें आलीं तथापि सद्दीचा जोर चढावर असल्यामुळें त्या सर्वांची व्यवस्था लागून अबादी झाली आणि तो खर्चही पण परस्पर भागला ! !

दुसरें उत्तर, इंग्रज लोकांचे आंगचे स्वाभाविक गुण आणि त्यांची राज्यपद्धत हें होय. स्वराजनिष्ठेनें वागण्याचा इंग्रज लोकांमध्यें जसा गुण आहे तसा इतर राष्ट्रीयांत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लक्षांत ठेवण्यासारखें आहे इतकेंच नाहीं पण आश्चर्य मानण्यासारखें आहे ! तेथील केवढा आणि कोणीही पराक्रमी पुरुष निपजो, राज्यकारस्थानी निपजो अथवा स्वबुद्धीबलावर प्रजेचा सर नाईक बनतो तो धनीचाकराचें नातें विसरत नाहीं ! कोणी प्रजेचा चाकर ह्मणून उदयास येतो, कोणी राजाचा पूर्ण प्रीतिपात्र

बनतो तथापि सर्वांचें लक्ष राजहिताकडेच असतें! इंग्लंडचा इतिहास साद्यंत वाचून पाहिला तर त्यांत असें एकही उदाहरण सांपडणार नाहीं कीं, एकादा अम्मलदार आपणच सर्व अम्मल बळकावून बसला अथवा एकाद्यानें आपलें प्रस्थ वाढविण्याच्या अथवा राज्याभिलाषाचे बुद्धीनें बंड केलें आणि त्याचें प्रायःश्चित्त त्यास, त्याचे साथीदारांस अथवा सर्व प्रजेस भोगावें लागलें! अशीं मात्र कांहीं उदाहरणें सांपडतील कीं, कोणी तरी शूर पुरुष उत्पन्न झाला आणि त्यानें सर्व सैन्यभार आपला अंकित करून सोडला आणि त्याचे बलावर अनेक प्रांत सर केले असतां व अनेक करण्याची संधि आली असतां वरिष्ठांचा हुकूम सुटतांच तो सर्व अधिकार आणि संचय दुसऱ्याचे हवालीं करून आपण जणो त्या गांवचेच नाहीं असें समजून स्वस्थ रहातो! स्वार्थ साधण्याची उत्तम संधी असतां व सर्व सत्ता ताब्यांत असतां तें सर्व सोडून देऊन राजहुकुमाचे प्राधान्यत्व कायम ठेवण्याकडेच तनमन अर्पण करणें हें स्वराज्यनिष्ठेचें सामान्य दर्शक आहे काय? लार्ड क्लाईव्हचे मनांत आपण हिंदुस्थानचे राजे व्हावें असें आलें असतें तर अशक्य झालें असतें काय? खोटे दस्तऐवज करण्याचें पातक, लांच खाल्ल्याचे आरोप, फसवाफसवी करून बदनाम करून घेण्यांत जें आयुष्य, श्रम आणि पैसे घालविले ते सर्व स्वकार्य साधनांत खर्च केले असते तर इंग्लंडनें त्याचें काय केलें असतें! आणि इतकी विपत्ति तरी कां भोगावी लागली असती? तसेंच आमचे इकडे आलेले वार्न हेस्तिंग्ज साहेब जे इतका उपद्व्याप करून हजारोंच्या माना कापून कंपनीचा, राष्ट्राचा आणि त्याबरोबरच आपला तळिराम गार करीत असतांही त्यांच्याच बांधवांनीं अज्ञातवासांत, कारागृहवासांत, लोकपक्षीय लोकांच्या जाचांत आणि अवकृपेंत ढकलेले असतांही स्वराज्यनिष्ठा विसरले नाहींत! ही तारीफ करण्यासारखी गोष्ट नाहीं काय? ज्यानें काशीच्या राजास राज्यपदावरून ओढलें, मिरजाफरासारख्याची चांदी



आटवली, रोहिल्यासारख्यांचें निर्मूलन केलें त्याच्या अंतःकरणांत स्वाभिलाषबुद्धि असती आणि तीस अनुसरून वर्तन ठेविलें असतें तर बंगाल प्रांत तर असोच पण सर्व हिंदुस्थानांतून कमेटीच्या पाट्या उखळून आपणच बंगालाधिपती बनते तर अशक्य झालें नसतें. पण ईश्वरानें त्यांच्यामध्यें स्वराज्यनिष्ठा ह्मणून जो अत्युत्तम गुण ठेवला आहे तो त्यांच्या कसल्याही अपराधांचें आणि पातकांचें क्षालन करून त्यांचा उदयच होत जातो. आनराणीच्या वेळीं, मार्लबरो ह्मणून नामांकित सेनापति होता, तो पराक्रमाच्या आणि कीर्तीच्या शिखरावर असतांही, लढाई बंद करून येण्याचा हुकूम मिळतांच एकाद्या साध्या मनुष्याप्रमाणें लढाई सोडून गेला! हें स्वराज्यनिष्ठेचें दर्शक नाहीं काय? तेच कार्थेजियन, ग्रीक किंवा रोमन लोक पहा! स्वदेशप्रीति आणि भक्ति त्यांच्यासारखी कोठेंही नाहीं हें इतिहासप्रसिद्ध आहे. वरील मार्लबरो प्रमाणेंच प्रसंग कार्थेजचा प्रसिद्ध वीर हानीबाल हा रोमबरोबर लढाई मारीत असतां आला; तेव्हां त्यानें आलेल्या हुकुमाची काय वासलाद लावली? सीझरला सैन्याचें आधिपत्य सोडण्याचा हुकूम आला तेव्हां त्यानें सर्व सेनेट सभेस छपरावर ठेऊन रोमवर चाल करून आपणच राजा झाला, हें सुप्रसिद्धच आहे. नेपोलियन बोनापार्ट तरी याच मालिकेतले! [1]तेव्हां स्वराज्यनिष्ठा हा अपूर्व गुण इंग्रजांतच वास्तव्य

---

१ असें स्वराज्यनिष्ठ आमच्या देशांत फारसे झाले नाहींत हें खरें, तरी शिंद्यांच्या पदरीं जिवाबक्षी आणि श्रीमंत प्रतापसिंह महाराजापाशीं गोविंदराव महाजनी (दिवाण) हे होते. पहिल्यांनीं आपली स्वराज्यनिष्ठा कोणत्या प्रकारें दाखविली हें सर्वविश्रुत आहेच, पण दुसऱ्यास आमच्या न्यायी, दयाशील आणि तरवार बहाद्दर इंग्रजांनीं, जालंदराप्रमाणें शेणखईंत कसें बसविलें, उंदीर, घुशी, डांस, पिसवा इत्यादिकांकडून कसा समाचार घेवविला आणि शेवटीं

करीत असल्यामुळें त्यांच्या सत्तेस किती अडथळे आले तरी त्यांचें निरसन होऊन त्यांची सत्ता वृद्धी पावते.

आतां यांच्या राज्यव्यवस्थेचे संबंधानें थोडासा विचार करूं. यूरोपांतील सर्व राष्ट्रें स्वतंत्रपणाचा जो डौल मारतात तो आमच्या सारख्या पारतंत्र्यमग्न देशास अपूर्व वाटतो आणि त्यांच्या सारखें पूर्णस्वातंत्र्य आमच्या देशास मिळावें अशी इच्छाही पण केव्हां केव्हां आमच्या मनांत उत्पन्न होते हें सहज आहे. कारण हल्लीं विद्येचा प्रसार थोड्या बहुतानें कां होईना पण झाला आहे. ज्याला त्याला मानवी प्राण्याचे हक्क अमुक आहेत, त्यांपैकीं स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांस अमुक आहेत, पारतंत्र्यांत रहाणारे लोकांस अमुक आहेत, अमुक असणें अवश्य आहेत, इत्यादि गोष्टी समजूं लागल्या आहेत, वर्तमानपत्रांसही स्वातंत्र्य असल्यामुळें प्रजेवर दुःसह प्रकारचे जुलूम करणें बरेंच भयावह झालें आहे. तथापि, राज्यसत्तेची मर्यादा किंवा तिला कायदेशीर रीतीचा आळा स्वतंत्र प्रकारच्या राज्यव्यवस्थेंत नाहीं. ज्या वेळेस लोकापवादाचें भय नाहींसें होईल त्या वेळीं लोकांच्या स्वातंत्र्याचा जोर अर्थातच नाहींसा होऊन त्यांची बेभरंवशाची स्थिति होईल यांत संशय नाहीं. इंग्लंडच्या राज्यसत्तेचा प्रकार तसा नाहीं. इतर स्वतंत्र राष्ट्रांतील प्रवर्तक सत्ता अमर्याद असल्यामुळें व तिजवर कोणाचा दाब नसल्यामुळें त्या सत्तेचें चिरस्थाइत्व बेभरंवशाचें असतें तसा प्रकार

---

निराश होऊन कसें सोडून दिलें! इत्यादि गप्पा सांगणारे लोक अद्याप आहेत आणि ज्या राजाचे राजनिष्टेचे पायीं इतकें सुखसोहळे भोगले त्याचा उतारा साक्रेटिसासारख्या कालकूटानें कसा दिला आणि तो या पुण्य पुरुषानें विष्णु प्रसाद समजून राजनिष्टेचा कसा कळस केला हें सांगून नेत्रोदक स्नानानें पावन होणारेही अद्याप आहेत.



इंग्लंडचा नाहीं. इंग्लंडची प्रवर्तक सत्ता राजाची आहे. त्यांत लोकांचा शिरकाव त्यांच्या सामान्य हक्कापलीकडे होत नसल्यामुळें आघाताचे प्रसंग टाळण्यास चांगली संधी सांपडते.

(४) सर्व राज्यसूत्रें लोकांच्या हातीं असलीं आणि त्यांजवर कोणाचा दाब नसला ह्मणजे व्यक्तिवाचक स्फुरण उदयास येतें आणि त्याचा जोर वृद्धि पावत गेल्यास राज्यामध्यें नेहमीं उलटा पालटी होतात हें सीझर, पॉम्पी, ग्रिशिस ट्रेटस रिएन्सी, सिला, मेरियस इत्यादिकांचीं चरित्रें वाचलीं असतां सहज लक्षांत येणार आहे. यासाठीं लोकांची सत्ता स्वैर असणें चांगलें नाहीं. यावरून इंग्लंडांतील लोकांची सत्ता कमी आहे असें आह्मी सांगतो असें कोणी मसजूं नये. यांची सत्ताही इतर स्वतंत्र देशांचे जवळ जवळच आहे तथापि लोकसत्ता आणि राजसत्ता समतोल असल्यामुळें आणि लोकांच्या निष्टेचे पूर्णत्व राजापाशीं असल्यामुळें अमर्यादसत्ते पासून होणारे अनर्थ टळतात ती सत्ता अबाधित चालते. ही सत्ता नसती, राजाचे ऐश्वर्य, इभ्रत आणि डामडौल इत्यादिकांच्या महत्वापुढें इतर महत्वाकांक्षी लोकांचे तेज पडलें असतें तर एलीजाबेथ राणीचे मृत्यूचे वेळीं, क्रामवेलच्या मुलाला पदच्युत केले त्या वेळीं, दुसऱ्या जेम्सराजाला राज्य त्याग करावा लागला त्यावेळीं आणि आनराणी मेली तेव्हांचे प्रसंग अशा स्वमहत्वाकांक्षी लोकांनीं कधींही टाळले नसते. यदाकदाचीत कोणाची अंतरंग साधक इच्छा असली तरी तीस लोक सह्या मिळालें नसल्यामुळें आंतले आंतच करपून गेली असेल. असा प्रकार नसतां तर दुसरा प्रसंग खेरीज करून इतर देशांतून राजपुत्र गोळा करून आणावे लागण्याचें कारण पडतेना. असो, अशा प्रकारानें लोकसत्ता मर्यादित आहे आणि प्रवर्तकसत्ता राजाधीन आहे तरी इंग्लंडचे लोक स्वहक्क संरक्षणार्थ आणि संपादनार्थ नेहमी तत्पर असतात. राज्य व्यवस्थेवर सारखी नजर असते

राजकृपे पेक्षां लोककृपेची मात्तबरी विशेष मानली जाते. लोककृपेचें पर्यवसान हौस आफ कामन्स पर्यंत असल्यामुळें आणि हौस आफ लार्डस हे त्यांवरील दर्जाचे असल्यामुळें पुढील दर्जांत जाण्याबद्दल लोकांची प्रवृत्ति होणें सहजी आहे. पण मौज अशी होते कीं, हाऊसआफकामन्स पर्यंत लोककृपेचा बहर बहर लुटण्यास सांपडतो तसा पुढें तर सांपडत नाहींच पण उलट प्रकार मात्र होतो. कारण आपल्या मंडळींतून गेल्यामुळें कामन्स लोकाचा भरवसा नाहींसा होतो. कामन्स पेक्षां लार्डस लोकांचे हक्क संरक्षणार्थ प्रयत्न करावा लागतो आणि असे पिढीजादे लार्डस तेथें अनेक असल्यामुळें नव्या लार्ड साहेबांस त्रिशंकू प्रमाणें मध्येंच काळक्रमणा करावी लागते !! असो, तर अशा प्रकारें इंग्रजांची राज्यव्यवस्था विभाजित असल्यामुळें ती ज्या ज्या देशांत स्थापीत होते तेथें तेथें चिरस्थाई होऊन रहाते.

पूर्ण स्वातंत्र्य आणि विभजनीय स्वातंत्र्य यांचें साधारण स्वरूप वाचकांस कळविलें. आणि या दोहों पैकीं आमच्या सरकारची राज्यपद्धत चिरस्थायी कां होतें याचेंही पण दिग्दर्शन केलें. आतां आमच्या राज्यकर्त्यांनीं अगदीं थोड्या अवकाशांत सर्व हिंदुस्थान इंग्रजीमय केलें! रुप, रंग, वे.त्यांचे कल्पनेनें अद्याप आकळले नाहींत ते मात्र इकडे शिलक राहिले त्याचें एक कारण स्वराज्य निष्टा हें तर स्पष्ट झालेंच आहे. पण स्वदेशभक्ति, स्वदेशाभिमान, उद्योगशीलतां दृढनिश्चय आणि शोधकबुद्धी हें गुणही यांच्यांतील प्रत्येक व्यक्तींत आढळून आल्या शिवाय रहत नाहींत. हें दुसरें कारण होय. रेलवेंतील टिकेट कलेक्टरा पासून ते थेट राजमंत्री अथवा राजापर्यंत हे वरील सर्व गुण सारखे भरलेले आहेत आणि त्यांचा उपयोग प्रसंगोपात आणि शक्त्यनुसार करण्यास ते कधींही आळस करीत नाहींत. यांच्यांतील हें विशेषत्व आमच्या वाचकांनीं लक्षांत ठेऊन किंत्ता बळविण्या सारखे आहे. इंग्रज लोक व्यापारा करतां हिंदुस्थानांत आले काय? राज्यकारस्थानांत पडले काय? तगतूनी दांडी बगलेंत मारून तरवार हातीं घेतली काय आणि असें करतां करतां सर्व हिंदुस्थानचे राजे बनले काय? हा सर्व गोडबंगाली खेळा सारखाच प्रकार नाहीं काय? होय, खरेंच तसें झालें यांत संषय नाहीं. त्यांच्या देशाभिमानाचे अतिरिक्तपणामुळें त्यांच्यांत जो उद्योगी स्वभाव उत्पन्न झाला आणि त्याला शोधकबुद्धीचे व राजाश्रयाचें नें सहाय्य मिळाले त्याचा परिणाम त्यांच्या वाणीज्य वृत्तीचे उन्नतीवर आणि राज्यकारस्थानावर घडला असें म्हटल्यास अयोग्य दिसणार नाहीं.



आमचे पारशी मंडळ आज अकरा शतकें आमच्या देशांत आहे आणि व्यापाराचे कामांत इंग्रजांचा दुय्यम नंबर हेच आहेत असें ह्मटलें असतां चालेल. इतक्या शतकांत आमच्या देशाची अनेक रूपांतरें झालीं, शेकडों गांवें आणि शहरें बरबाद होऊन लक्षावधी नवीन झालीं असतील !! पूर्वेकडून पश्चिमेस आणि उत्तरेकडून दक्षिणेस जातांना वाटेतच विराम पावलेलीं अनेक राज्यें यांच्या पहाण्यांत असतील पण यांतील एका गृहस्थानें तरी या नूतन देशाचा पत्ता लावून त्याचा वर्दी रिपोर्ट इराणचे दरबारीं दाखल केला अथवा एकादा पारसी हडेलहप्प करीत एकाद्या देशावर चालून गेला किंवा एकादे राजाची सरटीगिरी पत्करून स्वतंत्रपणानें आपल्या संततीसाठीं दहापांच गांवची सनद करून घेतली असें उदाहरण सांपडत नाहीं ! नाहीं ह्मणावयाला पुण्याचे एक मोदी अखेरच्या रावबाजीपाशी मुत्सद्दीगिरी करण्यांत शिरले होते, परंतु लौकरच त्यास हिरकणीचा प्रयोग करून राम ह्मणावें लागलें !! आपल्या हल्लींच्या अनुभवावरून पहातां पारसीक मंडळी चांगली हुषार आणि चपळ आहे. उद्योगांतही यूरोपियांची बरोबरी करतील असें असतां यांच्या वृत्तींत कोणत्याही प्रकारचें राजकीय अंतर पडलें नाहीं तें कां ? त्यास राजलक्ष्मी नकोशी वाटते काय ? आमच्या समजुतीनें ते स्वतःचे देशास पारखे

झाल्यामुळें आणि मुसलमानांच्या तरवारींचे तीक्ष्ण आणि क्रूर धारेमुळें स्वदेशास जी सलामी केली आणि जहाज हकारलें त्याबरोबरच स्वदेशाभिमानाचें गाठोळें समुद्रा स्तृप्यंतु केलें आणि नूतन प्रदेश परकीय अमलयामुळें अभिमानाचें कारण राहिलें नाहीं ह्मणून ते आज अकरा शतकें जसेच्या तसेंच राहिलें. तसा प्रकार आमच्या इंग्रजांचा नाहीं. ते स्वदेश पारखा करून अनेक देशांत हिंडले तरी ते स्वतःचें कल्याण व्हावें एवढ्याच इच्छेनें हिंडत नसून स्वदेशाचें हित साधण्याचे इच्छेनेंच हिंडत आले आणि ज्या उपायानें साधेल तितकें साधून घेण्यास त्यांनीं आळस केला नाहीं व करीतही नाहींत!! यामुळें त्यांचा उद्योगी आणि शोधकपणा वाढला तो इतका कीं, त्याचेंच फळ राज्य काबीजी हें मिळालें. इंग्रज लोक जरी व्यापार करीत असत तरी त्यांनीं येथील लोकस्थिति, धर्मव्यवस्था, सामाजिक स्थिति, व्यापार, शेतकी, न्यायपद्धति, लोकांचे मानसिक विचार पूर्णपणें अवलोकन केले आणि त्यास अनुसरून स्वलाभास योग्य अशी संधि साधून घेत घेत मग राजकारस्थानास हात घातला. इतका शोधकपणा, उद्योग आणि दृढनिश्चय दच, पोर्तुगीज आणि फ्रेंच यांच्यांत असतां तर आज ते हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत नाकीं सूत लावून जसे बसले आहेत तसें कधींही बसतेना यांत संशय नाहीं.

(१) इंग्रज लोक किती शोधक आहेत हें आमच्या वाचकांस सांगण्याचें कारण नाहीं, कारण आमच्या देशांतील उंदरांच्या कातड्यांपासून ते वेदापर्यंत सर्वांचा पत्ता काढून त्या पदार्थांचा कोणत्या प्रसंगीं कसा आणि कितपत उपयोग करावा हें ते होऊन आम्हास सांगत आहेत!! हा शोधकपणाचा गुण हिंदुस्थानचें राज्य कमावल्यानंतर आला नसून, राज्य कमावण्यास हा गुण साधनीभूत झाला. औरंगजेब बादशहाचे कारकीर्दींत इंग्रजांनीं काय शोधलें हें पहाण्याचें साधन आमचे पाशीं नाहीं तरी मुसलमानी कारकीर्दीची उतरती कळा आणि मराठ्यांच्या उदयाची चिन्हें त्यास चांगली समजलीं असावीत



अशी अटकळ करण्यास जागा आहे व त्यावेळचे इंग्रज इकडील हकीकत लिहितांना आलंकारिक भाषेचा उपयोग करीत असत असेंही पण दिसते. ( १ ) खालील टिपेंत श्रीमंत शिवाजी महाराजांचे संबंधानें दिलेलें पत्र आणि सातारा, कोल्हापूर आणि नागपूर येथील शिवाजी महाराजांच्या घराण्यांची स्थिति मनांत आली असतां इंग्रजांची परराज्याभिलाषबुद्धी आणि स्वराज्य उत्कर्षेच्छा किती व केव्हांपासून जागृत आहे आणि ती पिढ्यानपिढ्या अव्याहतपणानें साधन कसें साधीत आहे हें वाचकांचे लक्षांत आल्यावाचून रहाणार नाहीं ! ! हें तर असोच पण यांच्या विलक्षण शोधकपणाची साक्ष ज्यास पटविणें असेल त्यानें ईस्टइंडिया कंपनीचे संबंधानें हाउस आफ लार्डस, हाउस आफ कामन्स इत्यादिकां पुढें वेळोवेळीं चाललेली चौकशी, झालेल्या जबान्या आणि त्यावरून केलेले फेरफार वाचून पहावें!

---

( १ ) श्रीमंत शिवाजी महाराजाचे मृत्यूचें संबंधानें बंगालचे वखारींचे मालकास पत्र लिहिलें त्याचे तारीख १३ डिसेंबर सन १६८० इसवीचें उत्तर आलें त्यांत शिवाजीचे मरणाची बातमी इतक्या खेपा उडाली त्यामुळें आपणास हा अमर आहे असें वाटतें. त्याच्या पराक्रमाचा सूर्य लोपेपर्यंत तो मेला असें समजूं नये. असें ह्मणतात कीं, त्याच्यासारखा पराक्रमी त्याचे मागून राज्य चालविणारा कोणी नाहीं.

औरंगजेबच्या मरणाबद्दल तारीख ७ मार्च १७०७ इसवीचें पत्र लिहिलें त्यांत "पृथ्वीचे या भागाचा सूर्य मावळला आणि दुसऱ्या प्रतींतील तारा त्याच्या नजीक असल्यामुळें त्याच्या स्थानीं बसला आणि जरी पहिल्या प्रतींतील तारा दुसऱ्या प्रदेशांत आहे तरी आपला प्रकाश पाडण्यास प्रयत्न करील असा संभव आहे." याचा स्पष्टार्थ इतिहास वाचणारांचे लक्षांत आलाच असेल.

( मुंबई वर्णन. गो. ना. कृत पृष्ट ४१–४२ )

आमच्या बुद्धीनें यांतून अमुक प्रकार शोधण्याचा राहिला असें दिसत नाहीं. यांतील सार मराठी वाचकांस देण्याचें मनांत आणलें तरी एक लहानसें भारतच होईल यांत संशय नाहीं.

या जबान्यावरून इतकें लक्षांत धरण्यासारखें आहे कीं, वत्सलाहरण प्रसंगीं घटोत्कचानें जसा मायेचा बाजार भरवून दुर्योधनादिकांस नागवलें तद्वत अवघ्या पाउणशें वर्षांत सर्व हिंदुस्थान विलायतच्या बाजारानें भरून हिंदुस्थानची लक्ष्मी हरण केली आणि आह्मी नागवलों आणि अद्यापही त्याच स्थितींत आहोंत!! एकोणीसावे शतकाचे प्रारंभास हिंदुस्थानांत जो माल आणीत असत त्याचा खप बहुतकरून त्यांच्या त्यांच्यांत आणि त्यांच्या पलटणींतच होत असे. इकडील रहिवाशांपैकीं कोणी इंग्रजांचा मित्र असल्यास त्यास परत भेटी करितां विलायती माल घेई पण तो घरांत शिलक ठेवीत नसे. बापानें घेतलेला माल त्याच्या पश्चात घरांत आढळल्यास चिरंजीव बाहेर फेकून देत असत!! सुताचें, रेशमी आणि लोंकरी कापड इतकें चांगलें आणि स्वस्त मिळे कीं, तें पाहून इंग्रज व्यापारी लाजत! म्हैसूरची कांबळी ही विलायतेच्या लोंकरी कापडापेक्षां सरस असल्यामुळें यांच्या कापडाकडे कोणी ढुंकूनही पाहत नसे! इंग्रज आणि फ्रेंच लोकांनीं विलायतेंतील उत्तम माल म्हणून टिपु सुलतानास नजर दिला होता तो आमच्या सुलतान साहेबांनीं नजरेनें पाहिला कीं नाहीं ईश्वर जाणे! कर्मधर्मसंयोगानें टिपू साहेब निजधामास गेले आणि श्रीरंगपट्टण इंग्रजांचे हातीं आलें, तेव्हां हा विलायती उत्तमोत्तम नजराणा टिपू साहेबाचे चिल्हर सामानांत धुरळा खात लोळतांना सांपडला! असा प्रकार लोंकरी सामानापासून ते जोड्यापर्यंत होता! तीच आजची आमची स्थिति पहा! दिवे लावण्याचे काडीपासून ते पलंगपोसापर्यंत आणि बुटापासून ते पगडीपर्यंत विलायती पदार्थांनीं मढविले गेलों आहोंत! अवघ्या ७५।८० वर्षांत यक्षिणीच्या कांडीप्रमाणें आमची अदलाबदल झाली ती कशानें? इंग्रजांचा शोधकपणा आणि उद्योग हीं प्रबल असल्यामु-



ळें त्यांनीं आमच्या आवडीचा आणि सोईचा पुरा तपास काढून त्या पुरविण्याचें काम पतकरलें याचें हें फल होय!

व्यापाराचे संबंधानेंच इंग्रज सरकारचें शोधन असतें तर इतकें लिहिण्याचें कारण पडलें नसतें; पण तसें न करतां आमच्या जाती, आमचा धर्म, आमचा व्यवहार, आमची कुवत, आमच्या गृहिणींची स्थिति, आमचे खाण्याचे पदार्थ, आमची बुद्धि आणि तिचें वळणही अजमासून सोडलें! इतकेंच नाहीं पण आमच्यांतील ब्राम्हण, त्यांचा इतर जातींवर पगडा आणि त्यामुळें ख्रिस्त धर्मप्रसरणाचा उद्योग इत्यादि गोष्टींही ठरवून टाकल्या होत्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. या त्यांच्या शोधक बुद्धीचा, सतत उद्योगाचा आणि दृढ निश्चयाचा फायदा ते कोणत्या आणि किती प्रकारें मिळवीत आहेत, याचे प्रत्यक्ष पुतळे आपण आणि इंग्रज आहोंतच! जगाचे उत्पत्तीपासून दातृत्वाचें काम जर कोणी केलें असेल तर तें हिंदुस्थानानेंच! जगाचे उत्पत्तीपासून शांति आणि समाधान दाखवून हरण करणारा जर कोणी उत्पन्न झाला असेल तर तो इंग्रजच! असें म्हणण्यास हरकत नाहीं.

(६) या वरील प्रतिपादनावरून वाचकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं या मागील शिळ्या गोष्टी आहेत. हल्लीं आमचा उपजनिपज जर त्यांच्यावर आहे तर आतां शोधाचे आणि पुरविण्याचें तें काय राहिलें? याचें उत्तर इतकेंच कीं, पहिला शोध राज्य काबीजीचें संबंधानें होता पण हल्लींचा संपाद्य राज्याचे योग्य प्रकारें संरक्षण करण्याचा आणि त्यापासून स्वदेशाचे हित वृद्धिंगत करण्याचा असल्यामुळें त्यांस विशेष सावध आणि शोधक राहिलें पाहिजे. तसा प्रकार नसता तर दर दहा वर्षांस खानेसुमारी करण्याचें आणि त्याकरतां लक्षावधी रुपये खर्च करण्याचें अगत्य पडतें ना. आज हिंदुस्थानांतील प्रजा त्यांच्या पुस्तकाल्यांत जातवार आहे हें तर खरेंच पण कोणत्या गांवांत घरें किती, माणसें किती, गायी, हसी, घोडीं, बकरीं किती यांची नोंद त्यांच्या

दर्शर्गी आहे, तिचे अगत्य पडतेना. राजकीय संबंधानें याचा उपयोग किती आहे हें सूज्ञ वाचकांस सांगणें नलगे.

यावरून हें उघड होतें कीं, जोपर्यंत त्यांच्या इच्छेचा ओघ स्वहित आणि स्वदेशहित यांच्या इच्छेपासून परतला नाहीं, जोपर्यंत त्यांच्या इच्छेस अनुकूळ करून घेण्याचें पूर्ण सामर्थ्य आमच्यांत येण्याचा संभव नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय तर राहोच पण कोट्यावधि रुपये खर्च करून सर्व जगांतील मुखत्यारांची सभा भरवली, आणि मोठी "थंडरींग" व्याख्यानें देऊन महाभारतासारखी अथवा एका उंटाचे ओझ्या एवढी अर्जी तयार करून तिच्या लक्षावधी मती सर्व विलायती रस्त्यावरून हंतरल्या तरी त्यापासून विशेष उपयोग होईळ असें निदान आमच्या मतानें तरी घेत नाहीं !!

(७) आह्मी इंग्रज लोकांस चाहतो, त्यांचे उपकार स्मरतो, कृतज्ञता बुद्धीनें त्यांची संगत असावी असें इच्छितों, परवशतेचे तिखट शस्त्र आमच्या काळजास छसत असले तरी आह्मी त्याची इतकी परवा करीत नाहीं याचें कारण तें आह्मास ममतेनें वागवतात हें नव्हे. मागील परधर्मी राजाप्रमाणें छळीत नाहींत हें नव्हे, ते ख्रिस्ती आहेत आणि ख्रिस्ती धर्मांतील सर्व आज्ञा पाळून त्या आज्ञेप्रमाणें ते वागतात ह्मणून आह्मी त्यास भाळलों आहोंत असेंही नव्हे. किंवा त्यांनीं आह्मास तरवारीचे धारेखालीं धरलें असल्यामुळें प्राणाच्या भयानें आम्ही त्यांचे गुलाम झालों आहोत अथवा त्यांच्या गोडगोड वचनावर आणि दाखवित असलेल्या आशेवर त्यांचा स्तुतिपाठ गातो असाही प्रकार नाहीं. दुसऱ्याचे कल्याणांत साधेल तोंपर्यंत आपल्या देशाचे हित साधावें अशा इच्छेचे पुरुष यांच्यांतील राजकारस्थानांत अनेक झाले असल्यामुळें व आमच्या अंतःकरणास आज अनेक शतकें जें वळण लागलें आणि ज्याच्या व्यासंगानें आमची सहजासहजी तृप्ती होणार आहे त्या सरस्वतीचे मंदिरांतील तिसऱ्या चौकापर्यंत मजल मारण्याची परवानगी देण्यांत जे थोरपण दाखविलें आहे



त्यामुळें मृच्छकटिक नाटकांतील वसंतसेनेचा वाडा पहाणाऱ्या भटजीबोवा प्रमाणें आह्मी चक्क झालों आहोंत आणि हरिचंद्रा प्रमाणें भ्रतार, रोहिदासा सारखा पुत्र, आणि विश्वामित्रा सारखा सत्वहरक जन्मोजन्म मिळूदे ह्मणून तारामतीनें जशी परमेश्वरापाशीं मागणी केली तशी आह्मी कुईनव्हीकटोरिया सारखी देवशाली राणी, प्रजापक्षीय पार्लेमेन्ट, इंग्रजा सारखी विद्या आणि हिंदुस्थाना सारखा कल्पवृक्ष अक्षयी असोदे ह्मणून प्रार्थना करतो.

हें उदारत्व आणि सौम्यत्व न पतकरता मुसलमाना प्रमाणेंच तलवार आणि बायबल हातीं घेऊन हिंदुस्थानचें राज्य काबीजाचा आखाडा घातला असतां तर त्यांस सुखानें, शांतीनें आणि आपल्या खडबांधवांच्या हातावरहात देऊन हिंदुस्थानचें सार्वभौमत्व मिळतेना. दैववशें मिळालें असतें तरी हल्लीं सारखे निरवैर, चैनीनें आणि शांततेनें संभाळतां आलें नसतें यांत संशय नाहीं. कायद्यांची जी आणि ज्या स्वरूपाची टांकसाळ आज सुरू आहे त्याच्या अगदीं उलट दिशेनें ह्या टांकसाळींतील कायदे चालले असते. आज आह्मी तोंडाची तरवार गाजवून आपल्या मनाची शांती करून घेतो तसा प्रकार करतां आला नसता तर पेंढाऱ्या प्रमाणें गुपचुप हल्ला करून दक्षण द्वारचा दरवाजा मोकळा ठेवण्याचे यमाजीपंतास भाग पडलें असतें! सत्तावन सालचे बंड ह्मणजे हिंदु मुसलमानांच्या ऐन मारामारीचे कालांतील एक लहानसा खेळ, पण त्यानें आमच्या इंग्रजांचें अवसान किती खचलें ! नानासाहेब ह्या शब्दाचा दरारा कित्येक वर्षें पर्यंत साहेब लोकांस घाम आणित असे. कंसास जसा कृष्ण अथवा रावणास जसा राम जळीं, स्थळीं, झोपेंत, स्वप्नांत दिसत असे तद्वत आमच्या साहेब लोकांस नानासाहेबांचें भय वाटे. लार्ड मेकाले साहेब कीं, ज्यांची अस्खलीत वाणी रावास रंक आणि रंकास

राव करून सोडी ! ज्याचें पेन हिंदुस्थानास हवेतेव्हां सुवर्णाची लंका मनवी आणि हवेतेव्हां जगांतील भिकारापेक्षां भिकार, अज्ञानापेक्षां अज्ञान आणि षंढापेक्षां षंढ करी तीच त्यांची रसवंती नानासाहेबाच्या अकस्मीक हल्लयानें अडवी पडली, पेन टरटरू लागलें आणि बुद्धि भ्रमल्यासारखी झाली! परवां वासुदेव बळवंतानें जो हूडपणा केला तो निस्तरतांना पोलीसबहादराचा शूरपणा आणि चपळता जो नजरेस आली ती वाचकांच्या लक्षांत असेलच. पण ही पळापकड चालली असतां आमच्या इलाख्याचे दयाळू गव्हरनर साहेब, ज्यानीं दुष्काळा सारख्या प्रसंगीं रस्ते चोखळण्याचीं कामें सुरूं केल्याचा आखाडा घालून लक्षावधी लोकांस यमपुरीच्या रस्त्यास लावून या ऐहिक कर्मकटकटींतून सोडविलें त्यांनीं गोरा, घाऱ्या डोळ्यांचा, फडके आडनांवाचा आणि कोंकणस्थ शोधण्याचा सारखा सपाटा चालविला होता ! वासुदेव बळवंत फडके हें नांव उच्चारलें कीं मेंढी तरळ होण्याची पाळी येणारे शूर साहेब या वेळेसही कमी नव्हते!

तेव्हां सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, हिंदुस्थानचे राज्यव्यवस्थेंत शांतता राहून स्वदेशाचा लाभ करून घेण्यांत इंग्रज लोकांनीं जी धूर्तता आणि उदारत्व प्रगट केलें त्याचें फळ ते स्वतः तर मिळवीत आहेतच पण आह्मासही एक प्रकारचा लाभ झाला आहे यांत संशय नाहीं. हल्लीं तें उदारत्व आणि दातृत्व आखडींत आणलें असल्यामुळें आमच्या मानसोन्नत्तीला धक्का बसला आहे, आणि त्यामुळें आह्मास बराच काळ हाल आणि तापत्र यांत घालवावा लागेल हें खरें पण पाटाचें पाणी तुंबलें असतां तें जसा दुसरा ओघ पाडतें तसा आमच्या उन्नतीचा ओघ मनावरून तनुवर वळल्यास विशेष प्रकारचें नुकसान होईल असें ह्मणतां येत नाहीं.

वरील सर्व प्रकारावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं,



हिंदुस्थानांतील मुसलमानी राष्ट्राचा पाया, धर्म, शौर्य आणि कीर्ति यांजवर होता तसा इंग्रजी राष्ट्राचा पाया स्वदेशहित, स्वदेशाभिमान आणि स्वलोककल्याण यांजवर अवलंबून आहे. तथापि हें राष्ट्र शांतताप्रिय आणि शोधक असल्यामुळें यांच्या व्यवस्थेचा परिणाम सुखदायक नाहीं असें दाखविणें बरेंच घोटाळ्याचें आणि विचाराचें होतें. आज आह्मी वास्तविक सुखी किंवा आनंदी नसता सुखी आहोंत असें वाटतें याचें कारण यांच्या राज्यव्यवस्थेंतील उत्तम देखावे आणि कित्येक उदार, थोरमनाचे, आणि कीर्तिप्रीय लोकांचे बोल हें होय. हिंदुस्थानचे लोकांनीं लढाया करून इंग्रजास हिंदुस्थानांतून पिटाळून लावण्यापेक्षां त्यांस आपल्या बरोबरीचे करून त्यांच्या स्वाधीन हिंदुस्थानचें राज्य केलें असतां जगाचे इतिहासांत जें उदाहरण दृष्टीस पडत नाहीं तें इंग्रजांनीं दाखविलें अशी कीर्ति यावतचंद्र दिवाकरौ रहाणें अत्यंत श्रेयस्कर आहे असें प्रतिपादन करणारी मंडळी तिकडे आहेत. या त्यांच्या मताचा उपयोग व्हावा तितका होत नाहीं आणि अशा सद्गृहस्थांची संख्या थोडी असल्यामुळें होणारही नाहीं हें उघड आहे. तथापि त्याचा परिणाम कांहीं तरी झाल्यावांचून रहात नाहीं हें आम्हास शिक्षण देण्याचे कामीं मेकाले साहेबांनीं केलेल्या खटपटीवरून उघड होतें. अशा थोरमनाचे आणि उदार पुरुष इंग्लंडांत पुष्कळ निपजते आणि त्यांच्या हातीं हिंदुस्थानांतील कायदे आणि ते अमलांत आणण्याची शक्ति असती आणि त्यांस अनुसरून अम्मल बजावणी करणारे असते तर अपकारी सारखे इंग्रजी राज्यास कलंक लावणारे कायदे हिंदुस्थानांत चालू होऊन लक्षावधी लोकांचे प्राण तळमळतेना. मिठासारखे, जंगलासारखे, वारसाचे सर्टिफिकेटासारखे, आपल्या प्रजेस दुबळे करणाऱ्या हत्यारांचे कायद्यासारखे कायदे कधींच अमलांत येतेना व त्यांचा करडा अम्मल प्रजेचे तनूस, मनास आणि धनास जर्जर करून सोडतेना ! फार तर काय पण इंग्रजांत अपपर-

राव करून सोडी ! ज्याचें पेन हिंदुस्थानास हवेतेव्हां सुवर्णाची लंका मनवी आणि हवेतेव्हां जगांतील भिकारापेक्षां भिकार, अज्ञानापेक्षां अज्ञान आणि षंढापेक्षां षंढ करी तीच त्यांची रसवंती नानासाहेबाच्या अकस्मीक हल्लयानें अडवी पडली, पेन टरटरू लागलें आणि बुद्धि भ्रमल्यासारखी झाली! परवां वासुदेव बळवंतानें जो हूडपणा केला तो निस्तरतांना पोलीसबहादराचा शूरपणा आणि चपळता जो नजरेस आली ती वाचकांच्या लक्षांत असेलच. पण हो पळापकड चालली असतां आमच्या इलाख्याचे दयाळू गव्हरनर साहेब, ज्यानीं दुष्काळा सारख्या प्रसंगीं रस्ते चोखळण्याचीं कामें सुरूं केल्याचा आखाडा घालून लक्षावधी लोकांस यमपुरीच्या रस्त्यास लावून या ऐहिक कर्मकटकटींतून सोडविलें त्यांनीं गोरा, घाऱ्या डोळ्यांचा, फडके आडनांवाचा आणि कोंकणस्थ शोधण्याचा सारखा झपाटा चालविला होता ! वासुदेव बळवंत फडके हें नांव उच्चारलें कीं मेंदी तरळ होण्याची पाळी येणारे शूर साहेब या वेळेसही कमी नव्हते!

तेव्हां सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, हिंदुस्थानचे राज्यव्यवस्थेंत शांतता राहून स्वदेशाचा लाभ करून घेण्यांत इंग्रज लोकांनीं जी धूर्तता आणि उदारत्व प्रगट केलें त्याचें फळ ते स्वत: तर मिळवीत आहेतच पण आह्मासही एक प्रकारचा लाभ झाला आहे यांत संशय नाहीं. हल्लीं तें उदारत्व आणि दातृत्व आखडींत आणलें असल्यामुळें आमच्या मानसोन्नत्तीला धक्का बसला आहे, आणि त्यामुळें आह्मास बराच काळ हाल आणि तापत्र यांत घालवावा लागेल हें खरें पण पाटाचें पाणी तुंबलें असतां तें जसा दुसरा ओघ पाडतें तसा आमच्या उन्नतीचा ओघ मनावरून तनुवर वळल्यास विशेष प्रकारचें नुकसान होईल असें ह्मणतां येत नाहीं.

वरील सर्व प्रकारावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं,



हिंदुस्थानांतील मुसलमानी राष्ट्राचा पाया, धर्म, शौर्य आणि कीर्ति यांजवर होता तसा इंग्रजी राष्ट्राचा पाया स्वदेशहित, स्वदेशाभिमान आणि स्वलोककल्याण यांजवर अवलंबून आहे. तथापि हें राष्ट्र शांतताप्रिय आणि शोधक असल्यामुळें यांच्या व्यवस्थेचा परिणाम सुखदायक नाहीं असें दाखविणें बरेंच घोटाळ्याचें आणि विचाराचें होतें. आज आह्मी वास्तविक सुखी किंवा आनंदी नसता सुखी आहोंत असें वाटतें याचें कारण यांच्या राज्यव्यवस्थेंतील उत्तम देखावे आणि कित्येक उदार, थोरमनाचे, आणि कीर्तिप्रीय लोकांचे बोल हें होय. हिंदुस्थानचे लोकांनीं लढाया करून इंग्रजास हिंदुस्थानांतून पिटाळून लावण्यापेक्षां त्यांस आपल्या बरोबरीचे करून त्यांच्या स्वाधीन हिंदुस्थानचें राज्य केलें असतां जगाचे इतिहासांत जें उदाहरण दृष्टीस पडत नाहीं तें इंग्रजांनीं दाखविलें अशी कीर्ति यावतचंद्र दिवाकरौ रहाणें अत्यंत श्रेयस्कर आहे असें प्रतिपादन करणारी मंडळी तिकडे आहेत. या त्यांच्या मताचा उपयोग व्हावा तितका होत नाहीं आणि अशा सद्गृहस्थांची संख्या थोडी असल्यामुळें होणारही नाहीं हें उघड आहे. तथापि त्याचा परिणाम कांहीं तरी झाल्यावांचून रहात नाहीं हें आम्हास शिक्षण देण्याचे कामीं मेकाले साहेबांनीं केलेल्या खटपटीवरून उघड होतें. अशा थोरमनाचे आणि उदार पुरुष इंग्लंडांत पुष्कळ निपजते आणि त्यांच्या हातीं हिंदुस्थानांतील कायदे आणि ते अमलांत आणण्याची शक्ति असती आणि त्यांस अनुसरून अम्मल बजावणी करणारे असते तर अपकारी सारखे इंग्रजी राज्यास कलंक लावणारे कायदे हिंदुस्थानांत चालू होऊन लक्षावधी लोकांचे प्राण तळमळतेना. मिठासारखे, जंगलासारखे, वारसाचे सर्टिफिकेटासारखे, आपल्या प्रजेस दुबळे करणाऱ्या हत्यारांचे कायद्यासारखे कायदे कधींच अमलांत येतेना व त्यांचा करडा अम्मल प्रजेचे तनूस, मनास आणि धनास जर्जर करून सोडतेना ! फार तर काय पण इंग्रजांत अपपर-

भाव नसता तर हिंदुस्थानानें मांचेष्टरवाल्यास कधींच गप बसविलें
असतें. निरनुभवी सिव्हिल सर्वंटची जहाजेच्या जहाजें दरसाल इक
डे येतात आणि अवघ्या दोनचार महिन्यांत मराठी भाषेत प्रवीण
होऊन चाहील तो न्याय देण्यास तयार असतात ! तो प्रसंग आम
च्या देशबांधवांनीं टाळला असता ! ! आणि विलायतेस जाऊन
मनमानेल त्या गप्पा मारण्याचा जो संप्रदाय आहे आणि यांचा
परिणाम जो आह्मास भोगावा लागतो तो लागण्याचें कारण पडलें
नसतें. फार तर काय पण हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्या संयोगाचें
उत्कृष्ट उदाहरण सर्व जगाचें वळण पालटण्यास कारण झालें असतें.
परंतु हिंदुस्थानच्या दुर्दैवामुळें असो वा इंग्रजांचे विशेष अभिलाष
बुद्धीमुळें असो इंग्रजी राज्यामुळें हिंदुस्थानावर जे परिणाम घडले आणि
घडतात ते राजनीति विरुद्ध आहेत पण इंग्रज लोकांस फायदेकारक
आहेत. तेव्हां हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा आणि स्वतंत्र विचाराचे
इंग्रज राजनीती तिकडे पहातात आणि ज्यांच्या हातीं अम्मल ब
जावणीचें आणि अवसान ओळखण्याचें साधन असतें ते स्वदेश
आणि स्वबांधव हित पहातात ! तेव्हां त्यांस राष्ट्रीय सभा अव
डणार कशी ? आज राष्ट्रीय सभेच्या विरुद्ध जी कामगार मंडळी
आहे ती बहुतकरून अशाच विचारांनीं भरलेली असली पाहि
जे. दुसरें, अमेरिकेचें उदाहरण त्यांच्या पुढें असल्यामुळें आणि
अमेरिकेचें स्वातंत्र्य इंग्लंडचे नुकसानीस कारणीभूत झालें तसें हिंदु
स्थानांत झाल्यास आपल्यास आणि आपल्या जातभाईस जो यथेच्छ
चरिंदा मिळतो त्यास अंचवावें लागेल कीं काय यांचें
भय वाटत असल्यामुळेंच ते या सभेच्या विरुद्ध होतात असें
अनुमान करण्यास जागा होते. तिसरें, राष्ट्रीयसभा ही हिंदु
स्थानांतील कामगार लोकांच्या अन्यायांचें, जुलमांचें आणि लबा
डीचें पातडें विलायतेंतील पार्लमेन्ट पुढें आणि खुद्द महाराणी
साहेबांपुढें पसरणारी असल्यामुळें आपल्या स्वैर वर्तनास धक्का



बसण्याचा संभव आहे असें ही कित्येकांचे मनांत येऊन ते रा
ष्ट्रीय सभेचा पाडाव करण्यास तयार आहेत असें अनुमान के
ल्यास चुकीचें ठरणार नाहीं. एकंदरींत येथील राज्य व्यवस्थेचें
सूत्र ज्यांच्या हातीं आहे त्यांस राष्ट्रीय सभा संतोषास्पद ना
हीं, असें दिसतें.

आतां आमच्या बाजूनें विचार करावयाचा ह्मणजे राष्ट्रीय सभे
स देशस्थितीचें सहाय कितपत आहे हें पहावयाचें. या बाजूचा
विचार करण्या पूर्वीं राष्ट्रीय सभे सारख्या विषयास कोण को
णत्या गोष्टींची गरज आहे हें पाहिजे पाहिलें आणि त्या पैकीं
कोणत्या गोष्टीं आह्मी सिद्ध केल्या आहेत आणि कोणत्या करा
वयाच्या आहेत ह्याचा ही पण विचार केला पाहिजे.
आमच्या समजुतीनें राष्ट्रीय सभेस अनुकूल अशा गोष्टीं पैकीं प
हिली गोष्ट विद्या प्रसार, दुसरी आपल्या सरकारचे कायदे आ
णि ते आपल्यावर कसे अमल करतात हें समजण्याची शक्ति,
तिसरी धैर्य, चौथी तत्परता, आणि पांचवी एकवाक्यता. या पां
च गोष्टींची अनुकुलता असली ह्मणजे आमच्या राष्ट्रीय सभेस
धोका नाहीं, कितीही आणि केवढे ही प्रतिस्पर्धी उत्पन्न झाले
तरी भय बाळगण्याचें आगत्य नाहीं असें मानता येईल. या चार
गोष्टीं पैकीं कोणत्या गोष्टीं आमच्या अंगीं आहेत आणि त्या
कितपत आहेत हें आपण पाहूं.

जगांतील सर्व देशांत हिंदुस्थान हा विद्येचें कामांत आदि
आहे हें आलीकडील सर्व लोकांस मान्य आहे. हिंदुस्थानांत वि
द्या जेव्हां पूर्ण दशेस आली होती तेव्हां जगांतील बहुतेक स
र्व भागांत अज्ञानांधकार पसरला होता असेंही अनेक अधुनिक
विद्वान ह्मणत आहेत. परंतु या अत्युतम पदापासून च्युत झा
ल्यास कित्येक सहस्त्र वर्षें झालीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं.
आमच्या मागील अनेक राजांनीं फार मोठे मोठे पराक्रम केले,

भगीरथ प्रयत्न करून राज्यें संपादन केलीं आणि नवीन स्था
पनही केलीं. या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी तत्काली
न लोकांचा कल एक देश अथवा एक राष्ट्र यास अनुकूल अ
शा प्रकारचा नव्हता असें आपल्या देशांतील भाषा, धर्म, रीत
रिवाज आणि जाती या वरून स्पष्ट होतें. मराठ्यांच्या कालास
देशाभिमानाचा काल असें अर्वाचीन इतिहासज्ञा पैकीं किल्ये
कांचें ह्मणणें; आहे परंतु अशा राज्य संस्थापकाकडून ज्या गोष्टी
घडल्या त्यांत देशाभिमानाच्या गोष्टीं पेक्षां धर्माभिमान अथवा
"गोब्राह्मण प्रति पालक" ह्मणवून घेण्याच्या इच्छेची जागृती विशे
ष होती असें ह्मणता येईल. शिवाजी महाराजा पासून ते अखेर
च्या बाजीरावा पर्यंत ज्या गोष्टी घडल्या त्यांत विद्येच्या संस्का
राचा राष्ट्रावर परिणाम घडल्याच्या गोष्टी नाहींत. मुसलमाना क
डून हिंदु धर्मांवर जे आघात झाले त्याचा परिणाम देशावर घड
ला आणि ह्मणूनच तो शांतपणानेंफार दिवस टिकला नाहीं असें
म्हणावें लागतें. भारतीय युद्धा पूर्वीं या देशाचा बहुतेक भाग आ
रण्यमयच असल्या मुळें आणि त्याचें अधिपत्य स्थाईक झालें न
सल्या मुळें या देशाचें एक रूप होण्यास साधन नव्हतें. परंतु भा
रतीय युद्धा नंतर या देशांत जे अनेक राजे झाले त्यांतील
आमक्या राजाचे कारकीर्दींत हिंदुस्थानास एक रूप आलें आणि
ते अमुक शतकें सारखें पणानें होतें असें म्हणण्यास अद्याप आधा
र नाहीं. या वरून इतकेंच घ्यावयाचे कीं, आमच्या पूर्वकालीन वि
द्येच्या संस्काराची क्रिया सर्व देशास राष्ट्रत्व आणण्याचे उपयो
गीं पडली नाहीं.

तो प्रकार चालू मन्वंतरांत अगदीं पालटला आहे. आमच्या दे
शाचें आधिपत्य इंग्रज लोकांकडे गेल्यामुळें आणि ते परधर्मी, परद्वी
स्थ आणि परभाषी असल्यामुळें आमच्या देशांतील सर्व प्रांत एक
स्वरूपांत येत चालले आहेत. तरी राष्ट्रीय सभेस लागण्या इत



सामर्थ्य अद्याप आमच्यांत उत्पन्न झालें असें ह्मणतां येत नाहीं.
बंगाल इलाख्यांतील लोकांस इंग्रज लोकांचा सहवास होऊन पुष्कळ
दिवस आले असल्यामुळें आणि सर्व देशाचें स्वामित्व इंग्रजांचे पदरीं
पडण्यापूर्वींच या उभयतांची ओळख पटली असल्यामुळें इंग्रजी संस्-
तत्वांत ते सर्व देशाचे पुढें आहेत. इंग्रजी भाषा, इंग्रजी ग्रंथ आणि
इंग्रजी व्यवहार सर्व प्रतींचे लोकांत मनमुक्त पसरला असल्यामुळें
इंग्रजासारखें धैर्य, इंग्रजासारखें तत्परता, इंग्रजासारखा देशाभिमान
त्यांच्यांत इतर प्रांतीयांपेक्षां पुष्कळ जास्त उत्पन्न झाला आहे असें
ह्मटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. तथापि, तेथील लोकसंख्ये-
चे मानानें आणि राष्ट्रीय सभेस अनुकूलता मिळणाऱ्यांचे संख्येचे मा-
नानें विद्याप्रसार जास्त झाला पाहिजे आणि त्या विद्याप्रसारापासून
लोकांत ज्या तत्वांचा साठा झाला पाहिजे त्याच्या उणिवेचा मोठा
भाग अद्याप शिलक आहे असें त्यांच्या सामाजिक आणि धर्मवि-
षयांच्या स्थितिपणावरून आणि राष्ट्रीय सभेस ज्या दर्जाची, अधि-
काराची आणि धंद्याची मंडळी येते त्यावरून अनुमान करतां ये-
ण्यास हरकत नाहीं.

मद्रास प्रांत हा नंबर दोहोंत येईल. इंग्रजांची आणि मद्रासवा-
ल्यांची गांठ पडल्यासही शतक दीडशतक झालें तरी त्यांची तयारी बं
गालकरांइतकी दिसत नाहीं. इंग्रजी भाषा त्या मुलखांत जरी पुष्कळ
फैलावली आहे, इंग्रजी राजकारस्थानाच्या तळाचा ठाव घेतलेले
आणि वेणारे पुरुष जरी बरेच आढळतात, तत्परता हा विशेष गुण
इंग्रज लोकांपासून संपादन केल्याचीं चिन्हें याच्यांत जरी बरींच आ
हेत, तरी यासंस्कारापासून मानसोन्नतीस विशेष भर पडून इंग्रज लोकां
तील धैर्य, सतत उद्योगीपणा आणि साहस यांचा प्रादुर्भाव जितका
दृष्टीस पडला पाहिजे तितका दृष्टीस पडत नाहीं; इतकेंच नाहीं पण
सामाजिक गोष्टींतही त्यांचें पाऊल अद्याप पुष्कळ मागेंच आहे असें-
ह्मणावें लागेल. तसेंच राष्ट्रीय सभेच्या बळकटीचा चुना जो व्यापारी

भगीरथ प्रयत्न करून राज्यें संपादन केलीं आणि नवीन स्था
पनही केली. या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी तत्काली
न लोकांचा कल एक देश अथवा एक राष्ट्र यास अनुकूल अ
शा प्रकारचा नव्हता असें आपल्या देशांतील भाषा, धर्म, रीत
रिवाज आणि जाती या वरून स्पष्ट होतें. मराठ्यांच्या कालास
देशाभिमानाचा काल असें अर्वाचीन इतिहासज्ञा पैकीं कित्ये
कांचें ह्मणणें; आहे परंतु अशा राज्य संस्थापकाकडून ज्या गोष्टी
घडल्या त्यांत देशाभिमानाच्या गोष्टीं पेक्षां धर्माभिमान अथवा
"गोब्राह्मण प्रति पालक" ह्मणवून घेण्याच्या इच्छेची जागृती विशे
ष होती असें ह्मणता येईल. शिवाजी महाराजा पासून ते अखेर
च्या बाजीरावा पर्यंत ज्या गोष्टी घडल्या त्यांत विद्येच्या संस्का
राचा राष्ट्रावर परिणाम घडल्याच्या गोष्टी नाहींत. मुसलमाना क
डून हिंदु धर्मावर जे आघात झाले त्याचा परिणाम देशावर घड
ला आणि ह्मणूनच तो शांतपणानेंफार दिवस टिकला नाहीं असें
म्हणावें लागतें. भारतीय युद्धा पूर्वीं या देशाचा बहुतेक भाग आ
रण्यमयच असल्या मुळें आणि त्याचें अधिपत्य स्थाईक झालें न
सल्या मुळें या देशाचें एक रूप होण्यास साधन नव्हतें. परंतु भा
रतीय युद्धा नंतर या देशांत जे अनेक राजे झाले त्यांतील
आमक्या राजाचे कारकीर्दीत हिंदुस्थानास एक रूप आलें आणि
ते अमुक शतकें सारखें पणानें होतें असें म्हणण्यास अद्याप आधा
र नाहीं. या वरून इतकेंच ध्यावयाचे कीं, आमच्या पूर्वकालीन वि
द्येच्या संस्काराची क्रिया सर्व देशास राष्ट्रत्व आणण्याचे उपयो
गीं पडली नाहीं.

तो प्रकार चालू मन्वंतरांत अगदीं पालटला आहे. आमच्या दे
शाचें आधिपत्य इंग्रज लोकांकडे गेल्यामुळें आणि ते परधर्मी, परदे
स्थ आणि परभाषी असल्यामुळें आमच्या देशांतील सर्व प्रांत एक
स्वरूपांत येत चालले आहेत. तरी राष्ट्रीय सभेस लागण्या इत



सामर्थ्य अद्याप आमच्यांत उत्पन्न झालें असें ह्मणतां येत नाहीं.
बंगाल इलाख्यांतील लोकांस इंग्रज लोकांचा सहवास होऊन पुष्कळ
दिवस झाले असल्यामुळें आणि सर्व देशाचें स्वामित्व इंग्रजांचे पदरीं
पडण्यापूर्वींच या उभयतांची ओळख पटली असल्यामुळें इंग्रजी मान-
तत्वांत ते सर्व देशाचे पुढें आहेत. इंग्रजी भाषा, इंग्रजी ग्रंथ आणि
इंग्रजी व्यवहार सर्व प्रतीचे लोकांत मनमुक्त पसरला असल्यामुळें
इंग्रजासारखें धैर्य, इंग्रजासारखी तत्परता, इंग्रजासारखा देशाभिमान
त्यांच्यांत इतर प्रांतीयापेक्षां पुष्कळ जास्त उत्पन्न झाला आहे असें
ह्मटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. तथापि, तेथील लोकसंख्ये-
चे मानानें आणि राष्ट्रीय सभेस अनुकूलता मिळणाऱ्यांचे संख्येचे मा-
नानें विद्याप्रसार जास्त झाला पाहिजे आणि त्या विद्याप्रसारापासून
लोकांत ज्या तत्वांचा साठा झाला पाहिजे त्याच्या उणिवेचा मोठा
भाग अद्याप शिल्लक आहे असें त्यांच्या सामाजिक आणि धर्मवि-
षयांच्या शिथिलपणावरून आणि राष्ट्रीय सभेस ज्या दर्जाची, अधि-
काराची आणि धंद्याची मंडळी येते त्यावरून अनुमान करतां ये-
ण्यास हरकत नाहीं.

मद्रास प्रांत हा नंबर दोहोंत येईल. इंग्रजांची आणि मद्रासवा-
ल्यांची गांठ पडल्यासही शतक दीडशतक झालें तरी त्यांची तयारी बं
गालकरांइतकी दिसत नाहीं. इंग्रजी भाषा त्या मुलखांत जरी पुष्कळ
फैलावली आहे, इंग्रजी राजकारस्थानाच्या तळाचा ठाव घेतलेले
आणि घेणारे पुरुष जरी बरेच आढळतात, तत्परता हा विशेष गुण
इंग्रज लोकांपासून संपादन केल्याचीं चिन्हें यांच्यांत जरी बरींच आ
हेत, तरी यासंस्कारापासून मानसोन्नतीस विशेष भर पडून इंग्रज लोकां
तील धैर्य, सतत उद्योगीपणा आणि साहस यांचा प्रादुर्भाव जितका
दृष्टीस पडला पाहिजे तितका दृष्टीस पडत नाहीं; इतकेंच नाहीं पण
सामाजिक गोष्टींतही त्यांचें पाऊल अद्याप पुष्कळ मागेंच आहे असें
ह्मणावें लागेल. तसेंच राष्ट्रीय सभेच्या बळकटीचा चुना जो व्यापारी

आणि शेतकरीवर्ग तो राजकीय विचारांच्या ओघापासून पुष्कळ दूर आहे असें म्हणतां येतें. मद्रास आणि बंगाला येथील गेल्या ९ वर्षांचीं वर्तमानपत्रें चाळलीं असतां राजकीय विषयांत सारखे गुंग झालेले आणि त्या विषयाचा पुरा निकाल लागेपर्यंत पिच्छेहाट न घेणारे दोन्ही प्रांत सारखेच आहेत असें दिसेल, पण ज्या राष्ट्राशीं आपण झगडत आहोंत त्या राष्ट्राचा पुरा इतिहास आणि त्या इतिहासावरून पुढील धोरण बांधण्यांत बंगाल प्रांतीयांचाच नंबर वर येईल असें दाखविण्यास बरीच जागा मिळते. जमीनदार, इनामदार कीं, ज्यांचा आश्रय राष्ट्रीय सभेची कार्यसिद्धि करून घेण्यास अवश्यक आहे अशा लोकांत विद्येचें वजन वाढत आहे आणि वाढलेंही आहे; तथापि, कार्यकारणप्रसंगीं त्यांचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं असें राष्ट्रीय सभेच्या प्रसंगानेंच जी माहिती मिळाली त्या वरून समजून आलें आहे. राघोबादादांची राज्यतृष्णा, नानाफडणविसांची स्वकार्यसाधक बुद्धि, शिंदे होळकर इत्यादि मंडळींतील व्यक्तीवाचक पराक्रमेच्छा कुटुंब कलहास कारण झाली आणि या सर्व वृत्तींचा शेवट पेशव्यांच्या राज्य क्रांतीवर घडला तरी आपल्या लोक समुदायांतून त्या बीजाचा लय झाला असें अद्याप पर्यंत म्हणता येत नाहीं. हें तर असोच पण, अशा मारामारीचे प्रसंगास अनुरूप असें जें राष्ट्रीय धैर्य त्या वेळच्या लोकांत दिसत असे तें मात्र हल्लीच्या लोक समुदायांतून लय पावलें असें म्हटल्यास दोषास्पद होणार नाहीं. तत्परता आणि सतत उद्योग करण्याची इच्छा या गोष्टींचा प्रादुर्भाव मद्रासकरांत बराच प्रगल्भ दशेस आलेला आहे व येत आहे. याचें कारण दारिद्र्य हें जरी प्रमुख आहे तरी त्याचा उपयोग राष्ट्र हिताचे संबंधानें चाताचेताल होत आहे असें म्हणतां येईल. कारण या दोन्ही गोष्टींची वाढ शेतकरी, व्यापारी, यांत्रिककलाभिज्ञ इत्यादि स्वतंत्र लोकांत विशेष झाली पाहिजे, इतकेंच नाहीं तर आपण परतंत्र आहोंत, आपला या दे



शाशीं उदर निर्वाहा पेक्षां अन्य संबंध आहे आणि तो अगदीं निकट संबंध आहे व तो आपला संबंध कायम राखण्याची जबाबदारी आपणावर आहे असा समज सररहा सारख्या प्रकारें होऊन जर तत्परता आणि उद्योग हीं वाढला तर ती राष्ट्रहितकर होईल; आणि हीच वृद्धी राष्ट्रीय सभे सारख्या अत्यंत आणि महत्वाचे कार्यास उपयोगीं पडेल. इतकी तयारी मद्रासकरांची नाहीं आणि बंगाली लोकांची ही पण नाहीं अशी आमची समजूत आहे.

राष्ट्रीय सभेच्या धुरीण लोकांत ज्यांचीं नांवें आपण ऐकतों व जे गृहस्थ पहावयास सांपडतात तेच गृहस्थ वीस वर्षां पूर्वीं ईस्टइंडिया असोसियेशन सारख्या विलायती सभेंत वादविवाद करीत असलेले वाचावयास सांपडतात. विलायतेतील पार्लमेंट, फ्रान्स, जर्मनी, अथवा अमेरिका इत्यादि देशांत दरसाल निरनिराळ्या विषयांनीं शृंगारलेले नवे नवे अनेक पुरुष ऐकावयास सांपडतात आणि त्यांची स्वदेश उन्नत्यर्थ अव्याहत खटपट चाललेली आपणास नेहमीं वाचावयास मिळते, तसा प्रकार वरील दोन्ही इलाख्यांत तिकडील विद्यावृद्धीचे मानानें दृष्टीस पडत नाहीं. या वरून आपणास सहज अनुमान करता येईल कीं, वरील दोन्ही इलाखे राष्ट्रीय सभेस योग्य होण्यास आणखी बऱ्याच काळाची अपेक्षा केली पाहिजे.

वायव्य प्रांत आणि मुंबई हे दोन्ही इलाखे अद्याप पुष्कळ मागें आहेत. वायव्य प्रांताची व्यवस्था जितक्या योग्य प्रकारें समजली पाहिजे तितक्या योग्य प्रकारें समजण्याचें साधन आह्मापाशीं नाहीं, तरी राष्ट्रीय सभेच्या बैठकींत त्या प्रांताची जी अहवाल दृष्टीस पडते त्या वरून राष्ट्रीय सभेस लागणाऱ्या साहित्या पैकीं पुष्कळ साहित्य अद्याप तयार होणें आहे. आमचा इलाखा जितक्या अंतरानें मागें आहे त्या वरून वरील दोन्ही इलाख्यांशीं तोलून पाहिलें असतां बुद्धिमत्तेंत, चपलतेंत, ग्राहक शक्तींत, आणि तत्प

रतेंत आमचा इलाखा वाढ आहे असें ह्मणावें लागेल. बंगाल आणि मद्रास इलाख्यांस ज्या धोरणावर शिक्षण मिळालें तशा प्रकारचें शिक्षण देण्यांत आमच्या इलाखाधिपतींनीं तेंच धोरण धरलें असतें तर आज आमच्या इकडे शिक्षित लोकांची जी संख्या दृष्टीस पडते त्याच्या कितीपट ज्यास्त संख्या वाढली असती याचें अनुमान करतां येणें कठीण आहे.

आज आमच्या इकडे जे विद्वान पहावयास सांपडतात आणि राष्ट्रीय सभेसारख्या सभेंत चळवळ करणारी जी मंडळी दृष्टीस पडतात ती स्वबलावर पुढें आल्यापैकींच असून तेवढीच आहे असे मानावें लागेल. कारण आमच्या इलाख्यांत विद्येचें प्रसरण झालें तें अशा प्रकारच्या लोकांत झालें कीं, त्यावरून विद्या शिकणें हें सरकारी नौकरीचें द्वार आहे, ज्यास नौकरी पाहिजे असेल त्यानेंच विद्या शिकावी असा सर्व साधारण समज झाला; यामुळें इलाख्यांतील बहुतेक व्यापारी वर्ग, जमीनदारांचा वर्ग, राजेरजवाडे आणि जहागिरदारांचा वर्ग आणि शेतकरी वर्ग विद्याविहीन राहिला गेला. आपण श्रीमंत व्हावें, आपणास लोकांनीं सुखी ह्मणावें अशी इच्छा सर्व लोकांस असतेच आणि ती पुरी करण्याबद्दल प्रत्येक गृहस्थ खटपट करीत असतो. त्याप्रमाणें आमच्या इलाख्यांतील लोक खटपटीस लागले; परंतु सरकारचे नौकरी शिवाय श्रीमंत, सुखी आणि वजनदार होण्यास सुलभ आणि सुखकर मार्ग दुसरा सांपडला नाहीं. ज्यानें त्यानें विद्या शिकून नौकरीच संपादन करण्याचा प्रयत्न केला व अद्यापीही करीत आहेत! याचा परिणाम इतका चमत्कारिक झाला कीं, नौकरीच्या जाग्यापेक्षां नौकरी करणारांची संख्या अति वाढत चालली. तेव्हां अर्थातच दुसऱ्याचा पाडाव करण्याचीं (चांगलीं अथवा वाईट) साधनें मिळविण्याकडे लोकांचा कल वळला! व जे कामावर आहेत त्यांचे इच्छेसही जास्त अंकूर फुटूं लागल्यामुळें ते विद्येचें महत्व, थोरवी आणि देशकल्याणाच्या कामीं तिचा उपयोग करण्याचें



अगदींच विसरून गेले; इतकेंच नाहीं पण, आपल्या स्वतःचे जाग्याचे संरक्षणार्थ आपल्या देशबांधवांचें लक्षावधी रुपयांचें नुकसान करण्याचा समय फुकट जाऊं दिला नाहीं! असे अनेक महात्मे इनाम कमिशनच्या वेळे पासून ते हल्लीं चालू असलेल्या गडकरी प्रकरणापर्यंत दाखवितां येतील!! देशांतील प्रत्येक व्यक्तीचा जो फायदा तो देशाचा फायदा हें शास्त्रोक्त वचन आमच्यांवर पूर्ण अमल करीत आहे, पण त्याचा अनुभव आह्मांस उलटा येत आहे! आमच्यांतील एकाद्या वड्या कामगारानें रयतेस लुबाडावें, सरकारचा खजिना भरून आपणही सुखी व्हावें तों हरी रामोश्यासारख्या एकाद्या खर्पानें चांगली श्री मुखांत भडकावून सर्व छिनावून घ्यावें! तें पोलिसास सहन झालें तर बरें, नाहींतर त्यांनीं पिच्छा पुरवून त्यानें मिळविलें तें आण पहिलें असेल तेंही त्यांचे हवालीं करून पुनः दुसरें किरण साधण्याचे उद्योगास लागावें! एकाद्या वस्ताद तळहातावर सेखा सोसगाग भेटला आणि त्यानें पोलिसला आंगठा दाखविण्याचें मनांत आणलें तरी 'राष्ट्रांतील व्यक्तींचें जें हित तें राष्ट्राचें हित' साधणारे वाटाडे वकीलीचा धंदा करीत आहेतच!! त्यांनीं आपले श्रमांशाचा हिस्सा कुळाच्या सधनतेवर ठरवावा! अशा प्रकारच्या हितसाधनांत शिक्षित आणि अशिक्षित मंडळी दंग झाल्यावर देशहिताचें तारूं गडगच्च कां होणार नाहीं? आणि इतर व्यवसायी लोकांची इच्छा कां मुरडणार नाहीं.

आमचे इलाख्याचे लोकशिक्षणास आंत ओढून घेणारें दुसरें एक कारण घडलें. हें कारण घातक आहे तरी परद्वीपस्थ सरकारास साधनीभूत असल्यामुळें त्याचा प्रतिकार होणें विशेषंकरून लोकइच्छेवर राहिलें आह्मांस इंग्रजी विद्या देण्याचे कामीं कोणा ज्योतिषानें हातीं पेन धरलें हरी जाणे! त्यानें इंग्रजी शिकणारास प्रथमच (no) नो ह्मणजे नाहीं या शब्दापासून इंग्रजी शिकविण्याचा पाठ दिला व त्याप्रमाणेंच अनुभवही पण आला! इंग्रजांचे पूर्वींचे आमचे लोक

अडाणी होते, मूर्ख होते, भोळे होते, तरी ते आपलेपणास विसरले
नव्हते. धर्माचा कचरा कां असेना, पण तो विश्वासानें चाळगल
होता. सत्य आणि प्रामाणिकपणा ही अजब चीज पुस्तकांतून पा
केली नसतां ही पाळली होती. हल्लींच्या रजिष्टर केलेल्या दस्त
ऐवजापेक्षा त्या वेळच्या साध्या कागदास आणि शब्दांस सह
न जास्त किंमत होती. आपली माता पितरें, गुरु, राजा, आणि ई
श्वर ही एकाच योग्यतेनें मानलीं जात असत! स्वदेशभक्ति हा श
ब्द आणि या शब्दाची मिमांसाकरणारे लोक जरी कोणी नव्हते त
री "गोब्राह्मण प्रतिपालक" म्हणवून घेण्याची इच्छा जागृत अ
ल्या मुळें आपल्या ग्रामावरील आणि राज्यावरील संकट निवा
णार्थ देह अर्पण करण्यास तयार असत. हा सर्व प्रकार वर दर्शि
लेल्या "नो" मंत्राक्षर शब्दानें अगदींच नाहींसा केला!! आ
आमच्या समाजांतील शिक्षित मंडळाची चाळना केली तर धर्म
चेचानें मुळीच विचार न करणारांची संख्या जास्ती निघेल! प
ते निरीश्वर वादी नाहींत. माता पितरांची लाज वाटत असलेली मं
ळी गेल्या पंचवीस वर्षांपेक्षां कमी (ती ही याच व्यवसायांती
असल्यामुळें) सांपडेल; पण सांपडेल ती चोख सांपडेल. गुरूची ओ
ख रहाण्याचें आगत्यच राहिलें नाहीं. कारण दर तासास गुरु
राळा, आणि तोहि टाक भाड्याचा असलेला!! जर ओळख ठे
ण्याचें आगत्य पडलें तर गेल्या कातडीच्या गुरूचें पडणार आ
तेंही पण उदर व्यवस्थेच्या वासलातीकरतां पडणार! सत्य आ
णि प्रामाणिकपणा यांचें आणि नोकरीचें हाडवैर असावयाचें;
व्हां त्यास कवटाळण्यांत हंशील तें काय? याच्या उदाहरणास
ब जाणें नको. थोड्या दिवसां पूर्वीं जो यज्ञ झाला आणि ज्य
च्या ज्वाळा विलायतेंतील पार्लमेंटपर्यंत गेल्यामुळें कित्येक
भासदांच्या अंगाचा दाह झाला त्यांत व्यक्त झाला आहेच!! अ
क्ष्यभक्षण आणि अपेयपानाचा धुम धडाका उडविणें हेंच



धारणुकेचें आणि देशहिताचें साधन आहे, सवगोलंकार करून पशुवृत्तींत विलास भोगणें हेंच स्वातंत्र्य, पूर्वज निंदा हीच निस्पृहता, स्वोदरपोषण हेंच कर्तव्य, परोपदेश हेंच पांडित्य, परदास्य हीच सामान्यवृत्ति अशा समजाचा समाज जेव्हां आमच्या जुन्या मंडळी पुढें येऊं लागला तेव्हां अर्थातच त्यांस ही इंग्रजी राज्यांतील विद्या नको आणि वैभवही नको, असें वाटूं लागलें. दुर्योधनाची राक्षसी वृत्ति स्वकुलांतक होणार असें वाटून जसा व्यासांनीं सत्यवतीस उपदेश केला तसा उपदेश आमच्या जुन्या लोकांस सानुभव होत असल्यामुळें ते मागें पडले आणि स्वहितास आंचविले आणि आंचवीतही आहेत.

आमच्या इलाख्यांत लोकसंख्येच्या मानानें जितकी विद्या वृद्धि झाली त्यापेक्षां जास्त नहोण्याचीं कारणें वर दर्शविलीं आहेत व जी जहाली आहे तिचा उपयोगही पण योग्य प्रकारें होत नाहीं. असें वरील प्रतिपादनावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. या विद्येच्या संबंधानें आणि तिच्या उपयोगाच्या संबंधानें हल्लीं जो गवगवा सुरू

---

१ व्यास म्हणतात—आता तुमच्या या कुरुकुळाचा संतोष सूर्य अस्ताचलास चालला. तेथून पुढें धर्मक्रियांच्या लोपामुळें क्लेशकाल प्राप्त झाला आहे. वैराग्य आणि विवेक यांचा लोप होऊन अनाचार अत्यंत वृद्धि पावेल. अविद्येचा धडाका उसळून कोणी कोणास ओळखणार नाहीं. सिद्ध, साधू बदरिकाश्रमीं जातील. त्यांचें कोणालाही दर्शन होणार नाहीं. पृथ्वी, धन आणि रत्नें यांचा ग्रास करील. पर्जन्य यथाकालीं पडणार नाहीं. मंत्रवीर्ये अप्रमाण होतील. औषधी गुण सोडतील. देवतें देवपण सोडून पाषाण होऊन राहतील. तुझ्या कुलांत कलह माजून सर्व भूभुज मरण पावतील. गांधारीचा वडीलमुलगा हें कुरुकुल जाळून टाकील. माते, आतां तूं येथें राहूं नको. हे सर्व तुझे नातु एकदमच मरणार आहेत. यांची माया धरून येथें राहशील तर शोक व क्लेश पावशील.

आहे आणि याच्या विचाराकरतां कमिशन बसून धुमधडाका उडाला आहे आणि पुढेंही अशा वाटाघाटीचे अनेक प्रसंग येणार आहेत. परंतु विद्या शिकण्यांत लोकांचा जो हेतू आहे त्यांत बदल झाल्याशिवाय विद्येचें वास्तविक स्वरूप कळून चीज होण्याची निदान अह्मांस तरी आशा नाहीं.

राजकीय आणि सामाजिक विषयांचे संबंधानें वर्तमानपत्रांतून नेहमीं लेख येतात, सभांतून वाटाघाटी होतात, व्याख्यानांनंतर व्याख्यानें, मोठ्या रसाळ आणि गंभीर भाषेंत व उंच स्वरांत ऐकावयास सांपडतात; परंतु त्यांचा हितकर परिणाम झाल्याचें व लक्षांत घेण्यासारखें एकही उदाहरण आढळत नाहीं! आमच्या शिक्षित मंडळींत इंग्लंडच्या इतिहासाचीं पारायणें केलेले लोक काय कमी आहेत? रोम, ग्रीस, फ्रान्स इत्यादि स्वातंत्र्यप्रिय देशांच्या बखरी मुखोद्गत ह्मणणारे काय कमी सांपडतील? अमेरिकेचा ताजा इतिहास वाचणारांच्या किती सोमौत्या सांपडतील? पण त्या इतिहासांतील अमक्या गृहस्थाप्रमाणें अमका पुरुष आमच्यांत आहे असें दाखविण्या सारखे किती पुरुष आहेत? साधारण प्रतीच्या इंग्रजांत जें धैर्य, साहस, बंधुप्रीति आणि स्वदेशाची खरी कळकळ आहे ती आमच्यांत, नाहीं, ह्मणण्या इतकीच असल्यास न जाणो. हे आमचे विचार पहातांच, आमचे लोक परतंत्र असल्यामुळें आमच्या अंगीं गुण असले तरी ते दृश्य होण्यास साधन नाहीं असा जबाब देऊन कित्येक तेव्हांच मोकळे होतील; परंतु पारनेल प्रभृति मंडळी कीं, ज्यांचें ताजें वळण आमच्या पुढें आहे तें गिरविण्यासारखा धैर्य शाली पुरुष कोण आहे आणि अशास सहाय्य करणारे तरी किती आहेत? स्वदेशाकरितां तुरुंगाचा दरवाजा खुला ठेवा. ह्मणून सांगणारे आमच्या इलाख्यांत तर नाहींतच पण सर्व हिंदुस्थानाचा कलंक घालविणारा एकादा तरी हरीचा लाल सांपडेल असें ह्मणणें बरेंच जड आहे.

आमच्या समोर अगदीं साधारण सोलजर आमच्या अब्रूवर



आसक्त होऊन भर सडकेंत बदकर्म करीत आहे, लोक त्याच वाटेनें —टांग्यांतून आणि पायीं—जात आहेत, कायदेबाज व इंग्रजी अनुकरणानें मढविलेली मंडळी, 'काय हा घाणेरडा बेकायदेशीर प्रकार' ह्मणत तोंड मुरकून पुढें जात आहेत, स्वदेश प्रीति, स्वदेशभक्ति, जात्याभिमान आणि स्वलोक कल्याणाचें हडुक गळ्यांत बांधून उपदेश करणारे, 'अरेरे! काय आमची ही शोचनिय स्थिति!' असे शब्द उच्चारीत पुढें जात आहेत! पण एकही गृहस्थ त्या रान दांडग्या गळेलठ्ठापासून त्या कोंवळ्या पोरीची सुटका करणारा आढळला नाहीं!! इतकी स्व लोक प्रीति आणि स्व देशभक्ति ज्यांच्यांत ऊतू आली आहे ते आमच्या राष्ट्रीय सभेचे सभासद होऊन इंग्रज लोकांशीं राजकीय गोष्टींत सामनाकरणार! आणि त्यापासून आमचें हित होणार!! एकच काय पण असलीं हजारों उदाहरणें नेहमीं आमच्या पुढें येत आहेत आणि येतीलही.

या वरून आमच्या वाचकांनीं असें समजूं नये कीं, आमचे लोक अगदींच हीन धैर्य आहेत आमच्यांतून धैर्य हा गुण अजीबाद नाहींसा झाला असें आमचें मत आहे; तर तसा अर्थ नाहीं. आमच्या लोकांत धैर्य आहे आणि त्याचा उपयोग ते करतात. परंतु तो उपयोग ज्या ठिकाणीं आणि ज्या प्रसंगीं करणें अवशकतेचें असते त्या ठिकाणीं करण्याचें सामर्थ्य आमच्यांत नाहीं असें आह्मी ह्मणतो. वर जे घडलेलें आणि आमच्या येथेंच घडलेलें उदाहरण आह्मी दाखविलें तें दुष्कृत्य आमचा नर आणि विलायती नारीकडून घडतें तर आमच्याच लोकांनीं त्या नराधमाची चांदी आटवून एखाद्या साहेब बहादुराची शिफारस मिळविली असती! हें विजातीय जोडपें नसतां सजातीय जोडपें असतें तरी आमच्या लोकांनीं त्याची कणीक तिंबून चार साक्षीदार सजवून त्यास अंदमान बेटांतील ढेकळें फोडण्यास लावण्या पर्यंत धैर्य खर्चूं दिलें नसतें! आमच्या आणि इंग्रज लोकांच्या स्वभावांतील हेंच अंतर आह्मास बाधक आणि त्यांस साधक होत आहे.

तर आह्मी जी विद्या संपादन केली ती राष्ट्रहितकर बुद्धीनें व तात्विक दृष्टीनें केली नसल्यामुळें संपादित विद्येचा उपयोग सरकारच्या सोयी प्रमाणें उदरनिर्वाहाकडे होत आहे, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं असें ह्मटल्यास चुकीचें होणार नाहीं; अशा प्रकारची कां होईना, पण तशीही विद्या न शिकलेले लक्षावधी लोक आमच्या प्रांतांत आहेत, इतकेंच नाहीं तर निशाणी नांगर, निशाणी तागडी, निशाणी हातवडा सोडून जरा पुढेंही न सरकणारे लोक सहस्त्रानें मोजतां येतील! विद्याप्रसाराचे संबधानें आमचे इलाख्याचा पाय जर इतका मागें आहे तर आपल्या मायबाप सरकारचे कायदे किती आणि कसले आहेत, त्यांची अंमलबजावणी करणारी मंडळी कशी आहे, आणि हल्लीं आपणावर जे भयंकर प्रसंग गुजरत आहेत ते अमक्या कायद्यामुळें गुजरत आहेत याचें ज्ञान सारखवटपणानें कसें होणार? अज्ञानांधःकारांत गडप झालेल्या लोकांविषयीं विचार करणें असूं द्याच. पण ज्यांनीं बरेंच ज्ञान संपादन केलें आहे, जे इंग्रज लोकांचे ताब्यांत काम करून शेपन्नास रुपये रोजमुरा मिळवीत आहेत, त्यांची खातेवारी काढली असतां स्वदेशाचे कायद्याचें ज्ञान असणारे असे लोक किती सांपडतील? आणि त्यांनीं त्या कायद्यांची छान छनून साधक बाधक कायद्यांचा तक्ता करून तो सरकारास आणि लोकांस कळविला असे लोक एका हाताचीं किती बोटें मिटवतील? या प्रश्नाचें उत्तर तरी निराशेचेंच येणार हें उघड आहे. याचें कारण तरी हेंच कीं, स्वोदरपोषणापलीकडे आपलें कांहीं तरी आहे आणि तें आपणास बजाविलें पाहिजे ही बुद्धीच आमचे लोकांत अद्याप जागृत झाली नाहीं; यामुळें निर्वाहास लागणाऱ्या गोष्टीपलीकडे पहाण्याची गरज लोकांस वाटत नाहीं. ज्या सरकारी अंमलदारांस आणि वकिलांस कायद्यांचें अध्ययन करावें लागतें, त्यांस त्यांचें महत्व आणि तत्वें समजतात; परंतु अशा कायद्यांच्या ढिगांतून निवडानिवड करून ती सरकारापुढें आणि लोकांपुढें आणण्याची पंचाईत करून आपल्या चालू चरितार्थास व्यत्यय



आणण्या इतका स्वदेशभक्त आणावा कोठून? ज्या कायद्यांचा अंमल प्रत्यक्ष किंवा परोक्ष रीतीनें या वर्गावर बनावत आहे आणि ज्या कायद्यापासून जाणीव नुकसान होण्याचें भय आहे तेवढ्यांची काय चर्चा करवेल—त्यांत हीं कायदेकार आणि त्यांची अंमलबजावणी करणारे साहेब बहादूर नाखुष न होतील तर—तेवढी करण्यापुरतीच आमची मंडळी काय पुढें सरकेल तेवढीच! यापेक्षां जास्त दवदव करण्यासारखी मंडळी आमच्यांत अद्यापपर्यंत तयार नाहींत असेंच ह्मणणें भाग आहे.

इंग्रजलोकांची बलाय दूर आहे! त्यांचे कायदे करणें आणि करविणें हीं दोन्ही कृत्यें सारखीं चाललीं आहेत. हिंदुस्थानांतील कापड विलायतेंत खपत असल्यामुळें विलायतेचें नुकसान होतें असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, सर्व व्यापारी एक होऊन त्यांनीं पार्लमेन्टपुढें ओरड करावी आणि हिंदुस्थानचा माल बंद करवावा, जहाजांत दोनशें टन ओझें नेत असल्यामुळें व्यापाऱ्यांचें पोट भरत नाहीं तें भरण्यासाठीं सर्वांनीं एक होऊन दुर्वासऋषीप्रमाणें आरोळी ठोकावी आणि पांचशें टनाचा कायदा मागावा आणि तो पार्लमेन्टानें खुशाल द्यावा! लार्ड क्लाईव्ह साहेबांनीं बंगालचे नबाबाकडून अदमासें १८,२४० चौरस मैलाचा मुलूख उखळलेला तर मोंगलाकडून १,१६,८९० चौरस मैलांचा घेतला! अर्काटचे नबाबाकडून ३००० चौरस मैलांचा मुलूख मद्रासेजवळच घेतला, निजामाकडून २७,७५० मैलांचा प्रांत लुंगाडला! हें विलायतेस कळतांच भागीदारांचे तोंडास पाणी सुटतें आणि ते मालकी हक्काचा वाटा मागूं लागतात तेव्हां अर्थातच कमिशन बसून गुप्त चौकशी सुरू होते आणि कंपनीच्या सनदेंतील अधिकाराच्या कलमांचे अर्थ होऊं लागतात!! हा झगडा चालतां चालतां असें ठरतें कीं, कंपनीस हिंदुस्थानांतील राजेलोकांशीं लढाई करण्याचा जो अधिकार होता तो स्वसंरक्षणापुरताच होता, कुरापत काढण्याकरतां नव्हता. तेव्हां हें कंपनीचें कृत्य बेकायदेशीर आहे. तेव्हां हे मिळ

विलेले प्रांत सरकारांत द्यावे.यास मंडळी नाकबूल होते. तेव्हां सरकार
आणि मंडळी यांचे संमतीनें असें ठरविलें जातें कीं, हा मिळविले-
ला मुलूख पांच वर्षें कंपनीनें उपभोगावा आणि त्या मुदतींत दरसाल
४.० लक्ष रुपये सरकारांत द्यावे!ह्मणून तिसरे जार्ज राजाचे कारकीर्दी
त कायदा होतो! ‘गोठणच्या गाई मावळभट दान देई’ या
ह्मणीप्रमाणें हिंदुस्थानचा मुलूख अनधिकारानें आणि जुलमानें
संपादन करते कंपनी; त्या अन्यायाची, जुलमाची आणि अधिकाराची
शाबिदी करते पार्लमेंट; आणि त्या मिळविलेल्या मुलुखाची वांटणी
राजास मिळून कायदा ठरतो हिंदुस्थानाकरितां! तेच आमच्या इकडे
पहा! सरकारचे मनांत एकादें उत्पन्न काढावयाचें आलें कीं, आमची
कामगार मंडळी तयार! इनामें खालसा करावयाचीं? ही माहिती घ्या.
लोकांच्या सोंवळ्यांतील लोणच्यापर्यंत धुपून आणली पहा!
अबकारी खातें काढावयाचें? आह्मी डोस घेण्यास तयार! लोकांस
उपदेश देण्यास तयार! लोकांकडून अर्ज घेण्यास
अथवा करविण्यास तयार! आणि ती खपविण्याचा मक्ता घेण्यास
तयार!! सरकारचें हित आणि त्यांस मागें!छत्! मग आमचा अव
तार कशा साठीं! लोक बुडाले, रोगी झाले, मेले, तर त्याची परवा
आह्मी कां करावी? आपण सरकार हिताकरितां झटलों तर
आह्मास रा. ब.री मिळेल. अनरेबल होतां येईल आणि पेनशान घे
त्यावर ही एकाद्या संस्थानिकाचे दिवाण बनतां येईल!! हे कोण
तर फलाणे रा० सा०. यांनीं रावसाहेबी काय गाजविली,तर जंगल
खात्यांत असतां शिकेकाई, करवंदी इत्यादि गरीब लोकांचे निर्वाहा
चे पदार्थांचा खप लोकांत फार होतो याचा मक्ता करण्याबद्दल सर
कारांत शिफारस केली, डोंगरी दगडांतून लोखंड काढून त्याचे तवे
करून विकतात ते बंद केले!आणि जंगलच्या कायद्यांत सुधारणा क
रून सरकारचे खजिन्यांत भर घातली! हे रा. ब. इनकमट्याक्स
चे कामावर होते तेव्हां यांनीं लोकांच्या ओरडीकडे लक्ष न



देतां मोठ्या धैर्यानें आणि उत्साहानें ज्या ठिकाणीं सदेचाळीस ह
र रुपये इनकमट्याक्स वसूल होण्याची मारामार पडे तेथें नऊ
हजार रुपये पर्यंत उत्पन्न करून दाखविलें!! हे तिसरे स्पेशल
रा. सा. यांनीं आगगाडी करितां जमिनी देण्याचे बाबतींत फार क
सोशीनें रेल्वेकडील कामगारास खुष करून सोडण्याचे कामांत
फार मेहनत घेतली; इतकेंच नाहीं तर वेळोवेळीं झालेल्या सरका
री ठरावांतील शब्दार्थांवर टीका करून आणि आपल्या बुद्धिप्र
भावानें त्या ठरावांचा अर्थ संकोचित करून शिवाजी राजा पासू
न वहिवाटींत असलेलें गडकऱ्यांचें उत्पन्न सरकारचे पदरीं पड
ण्याकरतां म्हैसूरचे राज्याप्रमाणें नवीन सनदेचा नमुना तयार केला!!
असले पराक्रमी पुरुष आमच्या अज्ञान समजांत जों पर्यंत अवतीर्ण
होत आहेत तों पर्यंतचे कायदे आमच्या लोकसमाजात कितपत
हितावह होतील आणि त्यांचें पूर्ण ज्ञान लोकांस कितपत व कसें
होत असेल याची कल्पना वाचकांनींच करावी!!
आतां तत्परतेच्यासंबंधानें पाहिलें तरी हवाल अशीच!आपण पत्करं
लेलें काम–सरकारचे नजरेनें–चोखरीतीनें बजावण्यास तयार असे लोक
सरकारी कामगारांतच कांहीं असल्यास असतील. घड्याळें गळ्यांत
अडकवून टाईम बाजी दाखविणारे गृहस्थ कांहीं थोडे थोडके ना
हींत! इंग्रजी पांचवी इयत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून सर्वांजव
ळ घड्याळें आहेत पण त्यांचा उपयोग चुलीजवळ लांकडा साठीं
फुंकणी हातांत घेऊन बसलेल्या म्हातारी पलीकडे करण्याचें साम
र्थ्य कोणांत आल्याचें अद्याप दिसत नाहीं. यांनीं घड्याळ दाखवि
लें आणि तिनें चुलीकडे बोट केलें कीं फारेस्ट खात्याचें नांवानें
खडे फोडणाऱ्यांचीच संख्या विशेष! आमच्या लोकांची तत्परता आ
णि आस्था कितपत आहे हें सभादिकांचे ठिकाणीं तर दिसत
आहेच पण ज्या स्थानिक स्वराज्याबद्दल सारखा कंठ शोष के
ला त्याचा एकशोडशांशही अद्याप पदरीं पडला नाहीं तोंच त्या

ची हल हवाल कशी आहे आणि त्या वरून आमची तत्परता, आ
स्था आणि लोकहितकर बुद्धी कशी आहे हें चांगलें व्यक्त होत
आहे. सरकारी रिपोर्टांतील चांगुलपणा अथवा वाईट पणा विचारां
त न घेतां आमचें वास्तव स्वरूप जें वडोवडी अनुभवास येत
आहे आणि जी तत्परता दिसत आहे तिचें मोल करण्या इतकें बा
रीक नाणें तयार केल्या वांचून वाचकांचें समाधान करतां येणें
अशक्य आहे!! आमच्या समजुतीनें आणि हल्लीं जो अनुभव येत
आहे, त्या वरून वरील गुण आमच्यांत येण्यास किमानपक्ष आ
णखी अर्ध शतकावर दिवस लोटले पाहिजेत.

आतां राष्ट्रीय सभेस अनुकूल आणि इंग्रज लोकांशीं सामना
करण्यास अवश्य लागणारी पांचवी गोष्ट, एक वाक्यता ही होय.
ह्या एकवाक्यतेच्या संबंधानें खात्रें झालेलें आमच्या समाजांत
जितकें दृष्टीस पडतें तितकें अन्य देशांत सांपडणें कठीण आहे!
एका कुटुंबांत, माय लेंकरांत, पितापुत्रांत, पती पत्नींत एक वाक्यता
सांपडणें जेथें कठीण झालें आहे तेथें जातीची, धर्माची, आणि दे
शाची दाद कशची लागणार! आमचे कांहीं अधुनिक विद्वन्मंडळ आ
मच्यांतील एक वाक्यतेस जातिनिर्बंधाचें उदाहरण देऊन म्ह
णतें कीं, आमच्यांतील जातिविभाग हा देशाचे एक वाक्यतेची
नासाडी करतो! त्याचें छेदन झाल्या शिवाय हिंदुस्थानची एक
वाक्यता होणार नाहीं आणि त्याचें दारिद्र्य विमोचन होणार नाहीं!
यास प्रत्यक्ष प्रमाण इंग्लंड! हें नुसतें मतच असतें तर इतर व
ल्गनेंतील हेंही एक मत आहे असें समजून स्वस्थ बसतां येते.
परंतु या मताचे लोकां पैकीं कित्येकांनीं हें जातिविभागाचें बंड
मोडून पाहिजे त्या जातीशीं रोटी आणि बेटी व्यवहार करण्यास
प्रारंभ ही केला! हें पाहून हंसूं आल्या शिवाय रहात नाहीं;
इतकेंच नाहीं पण येवढ्या थोरल्या विद्येचे पायीं आमच्या देशा
चे हजारो रुपये खर्च होऊन त्याचें खरें सार्थक्य झालें नाहीं.



याचो दिलगिरी वाटते!! युरोपियन लोकांत जाती भेद नसला त
री संपत्ती भेद आहे. लार्ड साहेब सोलजर बरोबर चमचा घेण्या
स तयार असत नाहींत फार तर काय पण गरिबास शिवणार
देखील नाहींत. आपल्यांतील लक्षावधी लोक ख्रिस्ती झाले आ
हेत, ते बरेच सधन आहेत, विद्वान आहेत, नूतन दीक्षे प्रमाणें धा
र्मिकही आहेत, पण त्यास पंक्तीस घेऊन भोजन करणारे साहेब आहेत
काय? आपल्या मुली त्यास आणि त्यांच्या आपण करून सुखानें
संसार करीत असलेले श्रीमंत साहेब आढळतात काय? आमच्या
देशा प्रमाणें तुर्कस्थानांत तर जातींचें बंड नाहींना? मिसर देश
एक जातीमयच आहेना? मग हे देश इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि
कां सारखे उदयास कां येत नाहींत? हें लांबचे नको, हिंदुस्थानां
तील सर्व ब्राह्मणजात एक आहे, मराठे जात एक आहे. त्यांच्या
त्यांच्यांतील ऐक्याचे ध्वज उभारल्याचीं उदाहरणें कितीशीं दृष्टीस
पडतात! कोणताही देश झाला तरी त्याची व्यवस्था पोट आणि अय-
वव यांप्रमाणें असावयाचीच. पायाचें संरक्षण जोड्यांनीं व्हावयाचें, तें
पैठणी पागोट्यानें डोकीप्रमाणें करूं गेल्यास चालतां येणार नाहीं,
अडखळून पडावें लागेल, पाय मोडेल, डोकें फुटेल आणि असें क
रणाराचा प्राण जाईल. ही गोष्ट विसरली गेली. शूद्रांस वाटतें, आ
पण रात्रंदिवस शेतांत खपावें आणि या ब्राह्मणांनीं कानावर लेख
णी ठेऊन चैनीनें आमच्या श्रमाचा उपयोग घ्यावा असें कां? त्या
नाच अतिशूद्रांनीं अथवा चर्मकारांनीं म्हटलें कीं, आम्ही मात्र मेले
लीं ढोरें ओढून न्यावीं, जोडे शिवावे, आणि कुणब्यांनीं आम्हास
शिवूं नये, शेतांत दाणे, गूळ, शेंगा पिकवून स्वस्थ पणानें खावें असें
कां? आमची शुद्र मंडळी याचें जें उत्तर अतिशूद्रास देतील तेंच
ब्राह्मणांपासून मिळावयाचें. असल्या भ्रमाचा निरास शिव्या देऊन
होणार नाहीं. पालेभाजी खाणारा कोंबडें बकरें खाणाराकडे कां
जेवीत नाहीं अशी शंका घेणारांनीं कोंबडीं खाणारे, मुरळें बेटकुळ्या

गांडुळ खाणारांकडे कां जेवीत नाहीं याचा विचार केला ह्मणजे संशयनिवृत्ति होते. शूद्रांस वाटतें ब्राह्मण नष्ट झाले तर आपलें कल्याण होईल; पण त्यांच्या एवढें लक्षांत येत नाहीं कीं, शूद्रत्व ब्राह्मणत्व सापेक्ष आहे. तें जर नष्ट झालें तर शूद्रत्व जाण्याचा संशय नको. ऐक्य आणि संकर या दोन गोष्टी भिन्न आहेत. शिवाजी महाराजांनीं आपली स्वतंत्रता कायम केली ती ऐक्यानें केली, संकरानें नाहीं. आमच्या कांहीं सुधारकाचे डोक्यांत संकर करण्याचें जें पिसें शिरलें आहे तें जातीचें, शोधाचें आणि पूर्ण विचाराचें नसून स्वराज्य पटु पुरुषांच्या भुलवणीचें आहे. याचा परिणाम किती भयंकर आणि घातक होतो याचा अनुभव आपणांस येतच आहे. इंग्रजी कामगारांनीं बंगाली बाबू आणि ब्राह्मण लबाड ठरविणें मतलबाचें आणि त्यांस हितकर आहे, पण तेंच तुणतुणें आमचे लोकांनीं घेऊन नाचणें हें राष्ट्रीय सभेस तर घातक आहेच, पण देशास घातक आहे. ब्राह्मण परभु, परभु शेणवी, शेणवी मराठे, मराठे मुसलमान, मुसलमान पारशी यांच्या व्यावहारिक अडचणींत, धर्मसंबंधांत, जातिसंबंधांत हव्या तितक्या तक्रारी असोत, भांडणें असोत अथवा मारामाऱ्या होवोत; पण जेथें राष्ट्रहित आहे तेथें सुद्धां याच गुणाचें प्राबल्य असणें अनहितकारक, अनिष्टकारक आणि घातक झालेंच पाहिजे.

आह्मी ह्मणतों हिंदुस्थानांतील सर्व भिन्न भिन्न जाति एक झाल्या आणि त्या प्रत्येक जातीनें हिंदुस्थान देश हा आपला देश, हिंदुस्थानचें कल्याण तें आपलें कल्याण असें मनांत आणलें आणि वागणुक केली तरी राष्ट्रीय सभेचें अनहित होणार नाहीं. हितच होईल. असें न करतां प्रत्येक धंदेवाल्यांनीं एकमत होऊन देशहिताचे कामास हात भार लावला तरी त्यांत अकल्याण नाहीं, कल्याणच आहे; पण इतक्या सुदैवाचा समय येण्याची आशा नाहीं, हुरूप नाहीं आणि रंगही पण नाहीं. इतका ऐक्याभाव होण्यास कारण जातिविभाग नसून अयोग्याभिमान, आकुंचित विचार, अनुभवाभाव, व्यक्तिशःचर्क



हिततत्परता आणि देशहितदुर्मुखता हीं होत. ज्या समाजांत प्रौढता नाहीं, तो समाज कुचकामाचा; ज्या समाजांत स्वावलंबनाचें सामर्थ्य नाहीं, तो शेवग्याचे लांकडासारखा ढिसाळ व हवा तेव्हां नाश पावेल; ज्या समाजांत करारी लोक नाहींत; ज्या समाजांत भीष्मार्जुन नाहींत, पण शकुनी-कर्णिक आहेत, तो आग्याबोंडाचे झाडाप्रमाणें घातक स्पर्श करण्यासही अयोग्य; ज्या समाजांत पूर्व पुरुषांचा अभिमान नाहीं, गर्व नाहीं आणि तो उत्पन्न करण्याची इच्छाही नाहीं, तो नदीचे महापुरावरील गदळाप्रमाणें शोभायमान दिसला तरी वाऱ्याचे एका झुळुकेनें अथवा पाण्याचे सहज धक्यानें नाश पावेल; ज्या प्रजेला राजाचे अंतरंग कळत नाहींत, बाह्य रंगाचे आदि अंत समजत नाहींत आणि भुलून राजास चिकटावयास जाते अथवा त्याचा तिरस्कार दाखविते, ती पीत सर्पाचे स्पर्शाप्रमाणें लय पावते. ही आमचे आर्यलोकस (जुन्या) मंडळीची स्पष्टोक्ति आज आमचे समाजांत जागृत आहे असें ह्मणावें लागतें. अशी समाजस्थिति ऐक्याचे अथवा एकवाक्यतेचे उपयोगी पडणार नाहीं. आणि एकवाक्यता नाहीं तर राष्ट्रहितही नाहीं हें उघड आहे.

या वरील स्थितिवरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, राष्ट्रीय सभेस अनुकूल आणि हिंदुस्थानांतील इंग्रजी कामगारांशीं सामना करण्यास योग्य अशा अनेक गुणांचा तोटा आमच्या समाजांत अद्याप आहे. वास्तविक गुणांतील एकाही गुणाची छाया आमच्या समाजावर सारख्या प्रमाणानें पडली आहे असें ह्मणण्या सारखें साधन आमच्या पाशीं नाहीं. तेव्हां राष्ट्रीय सभेस अनुकूल अशी आमची स्थिति नाहीं असें ह्मणणें भाग येतें.

आतां या आमच्या ह्मणण्यावर कित्येक आक्षेपक असा तडाका उडवितील कीं जर आमच्या मध्यें विद्या नाहीं, कायदे जाणण्याची शक्ती नाहीं, हिम्मत नाहीं तर या पाच सभा आणि त्या ही एका पेक्षां एक टोले जंग कां, ज्याच्या दर्पानें सर्व इंग्लंड

मळमळून गेले आहे; कानसरवेटीव (राजपक्षीय) लोक करकरा
दांत खाऊन आह्मांवर हल्ले करूं लागले आहेत, हिंदुस्थानांतील
इंग्रजी कामगार "ब्राह्मण कणसा खुपतो" ह्मणून डोळे चोळीत
आहेत, हा प्रभाव कशाचा? विद्वतेचा, कायद्यांचे ज्ञानाचा, धैर्याचा
आणि एक वाक्यतेचा नव्हेकाय? कालच्या राष्ट्रीय सभेंत बसल्या
बैठकीस पासष्ट हजार रुपये झाले हें कशाचें फळ? प्रत्येक जि
ल्ह्यांतून, तालुक्यांतून, आणि साधारण गावांतून ही मुखत्यार निव
डले गेले आणि ते ही पण सभा भरवून निवडले गेले ते कसे? इ
त्यादि अनेक प्रश्न प्रस्तुतच्या बड्यांतील बड्या समारंभा वरून
आह्मा पुढें येतील आणि आह्मास दडपून चूप बसण्याचा प्रसंग
आणतील. परंतु जे या समाज वृत्तीकडे निरखून पहातील आणि
अंतर रचनेवर लक्ष पुरवतील ते याचें उत्तर युरोपियनचें सहाय्य,
विषयाचा नवीन पणा, आणि अनेक लोकांस समजण्या सारख्या अ
सलेल्या अडचणी हीच प्रस्तुत विषयाचें आज जें भव्य स्वरूप दि
सत आहे त्याचीं कारणें होत; इतकेंच सांगतील असा आमचा
समज आहे. याचा विचार करण्यास किंवा शोध करण्यास फार
मागील काळा कडे पहाण्याची गरज नाहीं. आपल्या इलाख्यांतील
सार्वजनिक सभांचा उदयकाल आणि हल्लींची अमावास्या हीच
यांची साक्ष होत. एकचशी काय पण अशा अनेक सभा आणि मं
डळ्या साक्ष देण्यास तयार आहेत कीं, वाचकांस त्यांचें स्मरण क
रविणें ह्मणजे स्वतंत्र ग्रंथ तयार करणेंच होईल! राष्ट्रीय सभे सा
रख्या थोर आणि राज कारणी सभेस ज्या गुणांची गरज लागते
ते गुण आमच्या आंगीं आले ह्मणून सांगणें ह्मणजे स्वदेशोन्न
त्यर्थ लागणाऱ्या सर्व गुणांत निम्मे पेक्षां जास्त लोक आह्मांत
तयार आहेत आणि ते राज कारस्थानपट युरोपियन बरोबर साम
ना करण्यास तयार आहेत असें ह्मणणें होय. असलें धाडस को
णी ही शहाणा मनुष्य करणार नाहीं. आमच्या समजुतीस असें



दिसतें कीं हिंदुस्थानांतील राज कारभारांत हात घालून त्यांतील
प्रश्न घोटाळे सरकारा पुढें मांडण्यास तयार होण्या सारखी स्थि
ति आमच्या समाजाची नाहीं. आह्मास आणखी पुष्कळ शिकलें
पाहिजे आणि तें युरोपियन लोकांपासून शिकलें पाहिजे. आह्मास युरो
पियनचें अनुकरण करण्याची, थोरपणाची, आणि कर्तव्य दक्षतेची संवय
नाहीं तरी स्वातंत्र शब्दाची थोरवी आणि किम्मत आमच्यांतील पु
ष्कळांस समजूं लागली आहे; परंतु स्वातंत्र ग्राहकता आमच्यां
त नाहीं या मुळें कर्णा सारखें फळ प्रसंगीं मिळत नाहीं. कित्ये
क पंडित ह्मणतात आमच्या विद्वतेची दिशा चुकल्या मुळें आह्मी
घोटाळ्यांत पडलों आहों. आह्मास वाटतें, कित्येक बाबतींत दिशा
चुकली नाहीं पण हेतू चुकल्या मुळें आह्मी अज्ञाना वस्थेतील स्थि
ति पेक्षां ही खालीं जात आहोंत!
असो, आमचे राज्य कर्ते आणि आह्मी यांच्यांत तुलना के
ली असतां आह्मी अद्याप पुष्कळ गुणांनीं आणि संख्येनीं मागें
आहोंत नामदार दादाभाई नवरोजी सारखे पुरुष शेकड्यांनीं मान
तां आले पाहिजेत. नामदार तैलंग हायकोर्टांत गेल्या मुळें मंडळी
च्या हाता पायाचे ढाळे पडून गेले तसा प्रकार उपयोगीं नाहीं.
एक तैलंग गेले तर दहा प्रति तैलंग अथवा सवाई तैलंग तयार
आहेत असा अनुभव आला पाहिजे. असा अनुभव येण्यास आम
च्या प्रस्तुतच्या विद्या वृद्धींत भर पडली पाहिजे आणि ती आ
मची आह्मी घातली पाहिजे. आम्हा परतंत्र हरिणा प्रमाणें आ
होत. आमची उडी हाणून पाडण्यास आमचे संरक्षक तत्पर आ
हेत आणि जों जों आह्मी पुढें जाऊं तों तों ते आम्हास मागें ओ
ढतील. कारण त्यांच्या आणि आमच्या इच्छा परस्पर भिन्न आ
हेत. आपला हात राखून जेंवढें देववेल तेंवढेंच ते आह्मास देणा
र हें उघड आहे. ते साधू नाहींत, संत नाहींत, तृप्त नाहींत,
आम्हा सारखे परतंत्र नाहींत, तरी त्यांची स्वातंत्रच तृष्णा प्रज्वलि

त आहे. तिला शांती नाहीं, दम नाहीं, आणि स्थैर्य नाहीं. आणि हा प्रकार जगांत सर्वत्र असावयाचाच. तेव्हां आमच्यानें होण्यासारख्या गोष्टींत त्यांस श्रम देणें जितकें कमी होईल तितकें कमी केलें पाहिजे. आमच्या गृहशिक्षणांत बदल केली पाहिजे असे उद्गार पुष्कळ लोकांचे तोंडून ऐकावयास सांपड तात, पण ते गृहशिक्षण याचा अर्थ काय करतात याबद्दल आमची समजूत पडत नाहीं. स्त्रियांस स्वयंपाक करतां येणें, पुरुषांनीं मुलांस आंगडीं टोपी घेणें, शाळेंत पाठविणें अथवा मागतील तितकीं आणि तसलीं पुस्तकें घेऊन देणें आणि नौकरीचा हंगाम आला कीं कोणाची आणि कशीं तरी आर्जवें करून चिकटवून देणें एवढाच गृहशिक्षण शब्दाचा अर्थ असेल तर सांगवत नाहीं! आमच्या समजुतीनें गृह-शिक्षण ज्याला ह्मणतात तें आमच्यांत मुळींच नाहीं. कुटुंबांतील प्रत्येक मनुष्य आपल्या भोंवतीं घडणाऱ्या गोष्टींतील चाहील ती गोष्ठ गृहण करून वर्तत असल्याचीं उदाहरणें आपल्यापुढें आहेत असें ह्मटल्यास हरकत नाहीं. गृहशिक्षेचा उपयोग पोकळ विद्यावृद्धी पेक्षां पुष्कळ जास्त आहे. विद्येचा सदुपयोग होणें हें पुष्कळ अंशीं अथवा सर्वांशीं ह्मटलें तरी चालेल, गृहशिक्षेवर अवलंबून आहे. गृह शिक्षा चांगली नसली आणि विद्यावृद्धि पुष्कळ झाली तरी व्हावा तसा आणि तितका फायदा होण्याची आशा नाहीं. यासाठीं विद्या वृद्धि आणि गृहशिक्षण हीं दोन्हीं आह्मांस तयार करावयाचीं आहेत, आमच्यांतील मोठा समाज जो शेतकरी, व्यापारी आणि इनामदार लोकांचा तो विद्येपासून पुष्कळ मागें आहे. हरळीची मुळी खुडून खुडून खाऊं म्हणतां म्हणतां त्या मुळीच्या खालचीं मातीचीं ढेंकळें ही नाहींशीं झाली तरी त्यांची इच्छा पालटत नाहीं. विद्या हरळी लावण्याचे उपयोगी पडते आणि ती हरळी वाढते ही पण विद्येनेंच, हें तत्व अद्याप त्यांस समजलेंनाहीं. तें समजवून देण्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. सही करतां आली किंवा साधारण लिहितां वाचतां



आलें तरी राष्ट्रीय सभेसारखी महत्वाची, जोखमेचा आणि राज्यकार स्थानाची सभा निभणें कठीण; त्यांतून इंग्रजासारख्या सततोद्योगी, दक्ष, धोरणी आणि प्रसंगावधानी पुरुषांचे करड्या नजरेखालीं टिकणें कठिण, तेव्हां अशा समयांत आणि काळांत शिक्षण द्यावयाचें तें चांगलेंच पाहिजे यांत संशय नाहीं. आमचे देशाचा प्राचीन व अर्वा चीन इतिहास, आमचे राज्यकर्त्यांचा देशाचा आणि तेथील राज्यव्यव स्थेचा इतिहास, आमचे लोकांत पाठांतररूपानें नाहीं, पण तत्वरूपा नें जेव्हां पसरेल तेव्हां आह्मी मनुष्य आहोंत, आह्मी हिंदुस्थानस्थ आहोंत, आम्ही परतंत्र आहोंत, आमच्यावरील राज्यकर्ते स्वतंत्र आहेत, त्यांच्यापासून आमचें हित होणें शक्य आहे आणि तें हित आ ह्मास करून घेणें हें आमचें कर्तव्य आहे, इत्यादि विचार त्यांच्या मनांत घोळून कालानुरूप क्रिया घडूं लागल. हें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत दहापांच, पांचपन्नास अथवा हजारपांचशें व्यक्तींनीं कितीही वलवल केली, धडपड केली, तरीं कार्याचें मोबदला अकार्य मात्र होईल; आणि तें इतकें वज्रलेप होईल कीं, त्याचा उपशम करणें कठीणच आहे. वळवाच्या पाउसानें ओढ्यास पाणी आलें ह्मणजे तो मोठमोठ्या डग-रींशीं धडका देतो आणि ती ढासळूं पाहतो, ती पांढऱ्या मातीची आणि चुनखडीची असल्यास विशेष बळकट होते, आणि मुरमाड असल्यास ढासळते. त्या ढासळण्याचा परिणाम ओढ्यास सुखद व्हावयाचा तर राहिलेंच पण प्रवाह बंद केल्यामुळें नदीस मिळणें आणि नदीचे साह्यानें समुद्रास मिळण्याचें नाहींसें होऊन केरकचऱ्या बरोबर आणि खेकड्याबेटकुळ्या बरोबर अंतरधान पावावें लागतें! तद्वत राष्ट्र सभे संबधानें योग्य व्यवस्था न झाल्या तर तीच सभा अपायकारक होण्याचा संभव आहे. तेव्हां अशा अवस्थेपा सून सुटका करावयाचीतर प्रथम आपल्या घरची व्यवस्था चोख केली पाहिजे. राष्ट्रीयसभा उभारण्यापूर्वी प्रांतीयसभा, जिल्हासभा आणि तालूकेसभा यांची मांडणी करणें अगत्याचें होतें आणि ती मांडणी

मंजूर झाल्यावर हें वरें प्रकर्ण हातीं घ्यावयाचें होतें. तसा प्रकार घडला नाहीं; राष्ट्रीयसभेची वेळ जवळ आली आणि या कामास आमचे हल्लींचे नामधारी राव साहेब उपयोगी पडत नाहींत. लोकल बोर्डांतील राव साहेब, ते नुसते राव साहेब, अजाण राव साहेब, खुर्चीवर बसण्या पुरते राव साहेब, किंवा "जी हुकूम" राव साहेब--बहुधा असतात असें इंदुप्रकाशानें म्हटलें आहे. तसले राव साहेब आणखी लाख झाले, राष्ट्रीय सभेस आले आणि बक्षिसें देऊन गेले तरी फायदा नाहीं. प्रसंगीं ती आपले इलाख्यांत व्हावयाची असली तर तेवढ्या पुरती चार दिवस हुल हुल करून पुन्हा आपण जणो त्या गावचेच नव्हे! अशा कृतीनें असल्या सभा चालावयाच्या नाहींत. एकाद्या धनशेटीनें मोठ्या समाजांत एक हजार रुपये दिले तरी ते गुरराख्यानें गायीचें सोंग घेणाऱ्या बहुरूप्यास दिलेल्या घोंगडी पेक्षां जास्त आहेत असें मानणें चुकीचें दिसेल. लौकिका करतां देणें आणि अस्थेनें देणें यांत फार अंतर आहे. ती अस्था विषयज्ञानाशिवाय उत्पन्न होत नाहीं, आणि तें विषयज्ञान सतत श्रम, दृढअभ्यास, आणि चांगल्या गुरू शिवाय मिळणार नाहीं. याचा विचार होऊन कृती घडूं लागे पर्यंत आमची स्थिति राष्ट्रीय सभेस अनुकूल आहे असें मानणें भ्रमाचें, दांभिकपणाचें आणि अविचाराचें आहे असें आम्हास वाटतें.

असो, हें प्रकर्ण बरें लांबलें आणि आमच्या पुस्तकाची मर्यादा संपली सबब पुरें करतों. आम्ही वर दर्शविलेल्या उभय स्थितिचा आमचे वाचक पूर्ण विचार करतील आणि विशेष आगत्याच्या गोष्टी करूं लागतील अशी बुद्धी परमेश्वर देवो आणि आमच्या सर्व देश बांधवाचें कल्याण होवो आणि तें इंग्रजाचे मार्फतीनें आणि आमच्या कर्तृत्वानें होवो ही त्या दीन दयाळ प्रभु पाशीं प्रार्थना आहे.